


# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com




* वर्ष ६५ वे * अंक २२३ * नांदेड * शनिवार, दि. २२ ऑगस्ट २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

## आसाममध्ये पावसाचा हाहाकार! आतापर्यंत १०६ जणांचा मृत्यू

**गुवाहाटी (प्रतिनिधी)**– आसाम राज्यात पावसाने हाहाकार माजला आहे. पावसामुळे राज्यातील अनेक जिल्ह्यातील नागरिकांचे घरे पाण्याखाली गेली असून अनेकांना सुरक्षितस्थळी स्थलांतरीत करण्यात आले आहे. आतापर्यंत पावसामुळे १०६ जणांचा मृत्यू झाला आहे.



आसाम राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या २० ऑगस्टच्या आकडेवारीनुसार आता सर्व नद्या धोक्याच्या पातळीखाली वाहत आहेत. आतापर्यंत १०६ जणांचा मृत्यू झाला आहे. पुरामुळे सर्वाधिक नुकसान शिवसागर, चराईदेव, जोरहाट आणि गोलाघाट जिल्ह्यांमध्ये झाले आहे. राज्यात ३,०८३ हेक्टर कृषी जमीन पाण्याखाली आहे. सध्या मदत छावण्यांमध्ये २३८ जणांनी आश्रय घेतला आहे. मदत वितरण केंद्रांवर १,१६५ छावणीबाहेरील रहिवाशांना मदत मिळत आहे. प्रभावित भागांमध्ये गुरुवारी राज्य सरकारने ४ वैद्यकीय पथके तैनात केली. सरकारी अधिकारी नुकसानीचे आकलन करण्यात व्यस्त आहेत.

आसाममध्ये पाच जिल्ह्यांतील ९२ गावांमधील १४ हजार ७९९ नागरिकांना पुराचा जबर तडाखा बसला आहे. नद्यांची पाणी पातळी हळूहळू ओसरत आहे, पण अनेकांना अद्याप घरी जाणे शक्य झालेले नाही. पूरग्रस्तांचे जीवन हळूहळू पूर्वपदावर येत आहे. प्रभावित नागरिक आपली घरे आणि शेती पुन्हा सुरळीत करण्यासाठी प्रयत्न करत आहेत. मुख्यमंत्री डॉ. हिमंत बिस्व सरमा यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेऊन राज्यातील पुरामुळे झालेल्या जीवित व वित्तहानीची तसेच सुरू असलेल्या मदत आणि पुनर्वसन अभियानाची सविस्तर माहिती दिली.

## चार्टर विमान दुर्गम भागात कोसळले; २ वैमानिकांसह ८ प्रवाशांचा मृत्यू

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)**– अमेरिकेतील अलास्का प्रांतातील अत्यंत कठीण आणि बर्फाच्छादित परिसरात एक भीषण विमान दुर्घटना घडली आहे. टेड स्टीव्हन्स अँकरेज आंतरराष्ट्रीय विमानतळावरून उड्डाण घेतलेले 'सेसना ४४१' हे दुहेरी इंजिन असलेले चार्टर विमान लष्करी रडार साइटवर उतरण्याच्या तयारीत असताना अचानक कोसळले. या भयानक अपघातात विमानातील दोन अनुभवी वैमानिकांसह सहा प्रवाशांचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला. अमेरिकन लष्कराच्या 'अलास्कन कमांड'ने या दुर्घटनेची आणि विमानातील सर्व ८ जणांच्या मृत्यूची अधिकृत पुष्टी केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, 'सिक्युरिटी एव्हिएशन' कंपनीचे हे विमान गुरुवारी दुपारी सुमारे १२:१५ वाजता पश्चिम अलास्कातील केप न्यूएनहॅम लाँग रेंज रडार साईटजवळ लँडिंग करत असताना अचानक रडारवरून गायब झाले.

## राहुल गांधी यांच्या कार्यक्रमाआधीच पुण्यात काँग्रेस-एबीव्हीपी कार्यकर्ते भिडले, सीओईपी कॉलेजवर राडा

**पुणे (प्रतिनिधी)**– काँग्रेसचे नेते आणि लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या पुण्यातील 'छात्रों की गूंज' या कार्यक्रमाच्या आधी पुण्यात मोठा राडा झाल्याचं दिसून आलं. पुण्यातील सीओईपी कॉलेजमध्ये काँग्रेस आणि एबीव्हीपीच्या कार्यकर्त्यांमध्ये राडा झाला. दोन्ही गटाचे कार्यकर्ते एकमेकांना भिडल्याने या परिसरात गोंधळ झाल्याची स्थिती निर्माण झाली. पोलीस घटनास्थळी पोहोचले असून त्यांनी दोन्ही गटाच्या हा वाद मिटवण्यासाठी प्रयत्न करत आहेत.

पुण्यामध्ये काँग्रेस नेते राहुल गांधी यांचा 'छात्रों की गूंज' हा कार्यक्रम शनिवारी आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात राहुल गांधी देशभरातील युवकांशी संवाद साधणार आहेत. मात्र त्याच्या आधी काँग्रेस आणि एबीव्हीपीमध्ये गोंधळ झाला आहे. या ठिकाणी काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार हेदेखील पोहोचले आहेत.

एबीव्हीपीचे काही कार्यकर्ते सीओईपी कॉलेजच्या परिसरात आले आणि त्यांनी या ठिकाणच्या तरुणांना धमकावल्याचा, तसेच राहुल गांधींच्या कार्यक्रमाला उपस्थित न राहण्याबाबत तरुणांना धमकावत असल्याचा आरोप युवक काँग्रेसने केला. या गोंधळानंतर काँग्रेसचे कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात जमल्याने परिस्थिती अधिकच चिघळल्याचं दिसून आलं.

२२ ऑगस्ट रोजी आरटीओ कार्यालयाशेजारील एसएसपीएमएस मैदानावर कार्यक्रम होणार आहे. सायंकाळी साडेचार ते रात्री साडेनऊपर्यंत कार्यक्रमाला पोलिसांनी परवानगी दिली. या कार्यक्रमाला ८ ते १० हजार नागरिकांची उपस्थिती अपेक्षित आहे. त्यामुळे गर्दी नियंत्रणासाठी प्रवेश व्यवस्था आणि पुरुष–महिलांसाठी स्वतंत्र व्यवस्था करण्याच्या सूचना पोलिसांनी आयोजकांना दिल्या आहेत. तसेच कार्यक्रमस्थळी किमान चार प्रवेशद्वार आणि स्वयंसेवकांची नियुक्ती बंधनकारक करण्यात आली आहे.

सर्व संबंधित विभागांकडून आवश्यक ना हरकत प्रमाणपत्र घेण्याचे पोलिसांनी निर्देश दिले. तसेच सुरक्षेसाठी सीसीटीव्ही व्यवस्था आणि कायदा–सुव्यवस्था राखण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. या कार्यक्रमात आक्षेपार्ह तसेच धार्मिक भावना दुखावणारा मजकूर किंवा घोषणाबाजी टाळण्याचे निर्देश पोलिसांनी दिले.

विविध जिल्ह्यांतून महिला आणि विद्यार्थिनी या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. राहुल गांधी विद्यार्थिनी आणि महिलांशी संवाद साधून त्यांच्या प्रश्नांवर चर्चा करणार आहेत.

## राज्यात २५ ते २८ ऑगस्टदरम्यान पावसाची शक्यता

**मुंबई (प्रतिनिधी)**– सध्या राज्यात पावसानं दडी मारल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. ऐन पावसाळ्यात उन्हाळा असल्यासारखी स्थिती जाणवत आहे. निम्म्याहून अधिक महाराष्ट्रात चांगला पाऊस झालेला नाही. त्यामुळं राज्यातील शेतकऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात चिंतेचं वातावरण आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार राज्यात २५ ते २८ ऑगस्टदरम्यान पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

ऑगस्ट महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात विदर्भात मुसळधार पाऊस पडणार असल्याची माहिती खुद्द पंजाबराव डख यानी दिली आहे. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार २५ ऑगस्ट ते २८ ऑगस्टदरम्यान धुळे, चंद्रपूर, वर्धा, नागपूर भंडारा गोंदिया, चंद्रपूरमध्ये पाऊस पडणार आहे. त्यानंतर वाशिम हिंगोली अकोला अमरावती बुलढाणा परभणी नांदेड बीड जालना जळगाव जामोद पैठण नेवासा कोपरगाव शिर्डी छत्रपती संभाजीनगर या भागात मुसळधार पाऊस पडणार असल्याची माहिती आहे.

सप्टेंबरमध्ये मात्र सर्वदूर मुसळधार पाऊस पडणार आहे. सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात हा मोठा पाऊस पडणार आहे. तर परतीचा पाऊस देखील मोठ्या प्रमाणात पडण्याची शक्यता आहे.

दरम्यान, पावसाळा सुरु होऊन साधारण अडीच महिन्यांचा कालावधी लोटला आहे. तरीदेखील राज्याच्या अनेक भागात चांगला पाऊस झालेला नाही. जुलै महिन्यात काही ठिकाणी पावसानं हजेरी लावली होती. मात्र, तो देखील पाऊस मर्यादीत स्वरुपातच होता. त्यानंतर पावसानं चांगलीच दडी मारल्याचं पाहायला मिळत आहे.

## प्रतिभा निकेतन शाळेचे मुख्याध्यापक अटकेत; विनयभंग, पोक्सो आणि अॅट्रॉसिटीअंतर्गत गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)**– शहरातील श्रीनगर/ कैलासनगर भागात असलेल्या नामांकित प्रतिभा निकेतन हायस्कूलमध्ये दहा वर्षीय अल्पवयीन मुलीसोबत गैरवर्तन करण्याचा प्रयत्न झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या प्रकरणी शाळेचे मुख्याध्यापक रवी सोनवणे (वय ५०) यास पोलिसांनी अटक केली आहे. विद्यार्थिनीच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आल्याने शहरात संताप व्यक्त केला जात आहे.

दहा वर्षीय पीडित मुलगी ही श्रीनगर भागातील प्रतिभा निकेतन शाळेत इयत्ता पाचवीत शिक्षण घेत आहे. सदरील शाळा ही शहरातील नामांकित आणि शिस्तप्रिय शाळा म्हणून ओळखली जाते. या शाळेने हजारो विद्यार्थी घडविले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, दोन दिवसांपूर्वी शाळेच्या वेळेत मुख्याध्यापक रवी सोनवणे याने अल्पवयीन पीडीतेला अन्य मुलींना लेझीम शिकविण्यासाठी बोलावून तिला शाळेच्या वरच्या मजल्यावर बाथरूम शेजारील खोलीत एकटे गाठून तिच्याशी गैरवर्तन करण्याचा प्रयत्न केला. या प्रकारामुळे घाबरलेल्या मुलीने आरडाओरड केल्यानंतर हा संतापजनक प्रकार उघडकीस आला. शाळा सुटल्यानंतर मुलीने घडलेला प्रकार पालकांना सांगितला.

घटनेनंतर पीडीतेच्या पालकांनी तात्काळ भाग्यनगर पोलीस ठाणे गाठून तक्रार दाखल केली. तक्रारीचे गांभीर्य लक्षात घेत पोलिसांनी तात्काळ कारवाई करत संबंधित मुख्याध्यापकाविरुद्ध विनयभंग, पोक्सो कायद्यासह अॅट्रॉसिटी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा तपास उपविभागीय पोलीस अधिकारी (शहर) रामेश्वर व्यंजने करत आहेत.

पोलीस निरीक्षक संतोष तांबे यांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी मुख्याध्यापक रवी सोनवणे यास अटक करण्यात आली असून घटनेचा अधिक सखोल तपास सुरू आहे. पीडित मुलीची वैद्यकीय तपासणी आणि समुपदेशन करण्यात आले आहे.

या प्रकरणात जिल्हा बाल संरक्षण अधिकारी विद्या आळणे यांनीही लक्ष घालून चौकशी केली. त्यांचे सहकारी निलेश कुलकर्णी आणि दिपाली इंगोले यांनी भाग्यनगर पोलिसांसोबत संवाद साधत माहिती घेतली. महिला व बालकल्याण विभागाकडून अशा प्रकरणातील पीडीतेला मिळणाऱ्या शासकीय मदतीसाठी प्रयत्न सुरू केले आहे.

प्रतिभा निकेतन शाळा ही नांदेडमध्ये कडक शिस्त आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी ओळखली जाते. या शाळेतून शिकलेले हजारो विद्यार्थी देश- विदेशात मोठ्या पदांवर अधिकारी म्हणून तसेच विविध क्षेत्रात कार्यरत आहेत. अशा प्रसिद्ध आणि प्रतिष्ठित शाळेतच हा प्रकार घडल्याने शैक्षणिक क्षेत्रात खळबळ उडाली आहे.

## नांदेड पोलिसांचा अवैध धंद्यांवर सर्जिकल स्ट्राईक; एकाच दिवसात ४९ गुन्हे दाखल, ८२ आरोपींवर कारवाई, २० लाखांचा मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)**– जिल्ह्यात कायदा, सुव्यवस्था व शांतता अबाधित राखण्यासाठी तसेच जिल्ह्यातील अवैध धंद्यांचे समूळ उच्चाटन करण्याच्या उद्देशाने नांदेड जिल्हा पोलीस दलातर्फे एकाच दिवशी संपूर्ण जिल्हाभरात विशेष मास रेड मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत ४९ गुन्हे दाखल करून जवळपास २० लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेश व मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, सर्व पोलीस ठाण्यांच्या पथकांनी शहरी तसेच ग्रामीण भागात एकाच वेळी धाडी टाकून अवैध व्यावसायिकांवर कारवाई केली आहे.

या विशेष मोहिमेदरम्यान जिल्ह्यातील संशयित अड्डे, गावठी दारूच्या हातभट्ट्या, देशी–विदेशी दारूची अवैध विक्री, मटका व जुगार अड्ड्यांसह प्रतिबंधित गुटखा साठ्यांवर अचानक छापे टाकण्यात आले. कारवाई दरम्यान रोख रक्कम, वाहने, गुटखा साठा, जुगाराचे साहित्य व दारू जप्त करण्यात आली. संबंधितांविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायदा, महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा व अन्न सुरक्षा मानके कायद्यान्वये गुन्हे नोंदविण्यात आले आहेत.

या मोहिमेत एकूण ४९ गुन्हे दाखल करून ८२ आरोपींविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात आली असून, एकूण २० लाख ५८ हजार १८२ रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर कामगिरी पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशान्वये, अपर पोलीस अधीक्षक सुरज गुरव आणि अर्चना पाटील, सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी, दुय्यम पोलीस अधिकारी व अंमलदारांच्या पथकांनी संयुक्तपणे यशस्वीरीत्या पार पाडली.




**नांदेड** : शहरात जल संधारणाचा संदेश देत महा वॉकेथॉन आयोजित करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, आ. श्रीजया चव्हाण, महापौर कविता मुळे, जिल्हा परिषदेचे सीईओ महेश पाटील, आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्यासह लोकप्रतिनिधी, विद्यार्थी, नागरीक, अधिकारी–कर्मचारी व जलसंधारण प्रेमींनी मोठ्या संख्येने आपला सहभाग नोंदविला. (छाया : करणसिंह बैस)

## मुखेड हादरले! प्रेम प्रकरणातून पित्याचा खून, आईवर चाकू हल्ला; ५ तासांत तिन्ही आरोपींना बेड्या

### एलसीबी आणि मुखेड पोलिसांची धडाकेबाज कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)**– मुखेड तालुक्यातील लादगा शिवारात प्रेम प्रकरणातून खून झाल्याची घटना घडली. या गुन्ह्यातील आरोपींना ५ तासांत पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.




यातील फिर्यादी यांनी आरोपी किशन राजकुमार जोगदंड (रा. दापका राजा) याच्याविरुद्ध पोलीस ठाणे चाकूर, जि. लातूर येथे दिलेल्या तक्रारीवरून काही दिवसांपूर्वी बलात्काराचा गुन्हा दाखल केला होता. याच गुन्ह्याचा राग मनात धरून दि. २० ऑगस्ट २०२६ रोजी रात्री सुमारे ११ वाजता लादगा शिवारातील शेतात आरोपी किशन जोगदंड याने आपल्या इतर दोन साथीदारांसह संगनमत करून फिर्यादीचे वडील बाबू पुंडलिक गायकवाड (वय ६० वर्षे) यांच्या डोक्यात चाकूने गंभीर वार करून त्यांचा जागीच खून केला. तसेच फिर्यादीच्या आईच्या तोंडावर चाकूने वार करून त्यांनाही जीवे मारण्याचा प्रयत्न केला.

या प्रकरणी पोलीस ठाणे मुखेड येथे गु.र.नं. २८८/२०२६, कलम १०३(१), १०९(१), ३५१(२), ३५१(३), ३(५) भारतीय न्याय संहिता (बीएनएस) सह कलम ३(२)(५) अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गुन्हा गंभीर स्वरूपाचा असल्याने पोलीस अधीक्षक डॉ निलाभ रोहन यांनी आरोपींच्या अटकेबाबत तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार अपर पोलीस अधीक्षक सुरज गुरव, उपविभागीय पोलीस अधिकारी (बिलोली) श्याम पानेगावकर आणि परिविक्षाधीन उपविभागीय पोलीस अधिकारी (देगलूर) वैभव पडवळ यांनी तात्काळ घटनास्थळी भेट देऊन तपासाच्या सूचना दिल्या.

वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा, नांदेड व मुखेड पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली. उपलब्ध माहिती व तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे आरोपींच्या हालचालींची माहिती घेत विविध ठिकाणी शोधमोहीम राबवून अवघ्या पाच तासांत आरोपी किशन राजकुमार जोगदंड, वय २२ वर्षे, रा. दापका राजा, सोहम सुंदरसिंह बयास उर्फ सोन्या, वय १९ वर्षे, रा. मुखेड, मंगेश निवृत्ती लिंगे, वय ५० वर्षे, रा. मुखेड यांना अटक केली. या तिन्ही मुख्य आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून पुढील अटकेची कायदेशीर कार्यवाही मुखेड पोलीस करीत आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशानुसार अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, उपविभागीय पोलीस अधिकारी शाम पानेगावकर आणि परिविक्षाधीन उपविभागीय पोलीस अधिकारी (देगलूर) वैभव पडवळ यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले, सपोनि विठ्ठल घोगरे, सपोनि गोविंद खैरे, पोउपनि महेश कोरे, पोउपनि साईनाथ पुयड व त्यांच्या पथकातील पोलीस अंमलदार तसेच पोलीस निरीक्षक चितांबर कामठेवाड, पोलीस उपनिरीक्षक गणेश माने, अभिजित तुतुरवाड, संदीप यामावार व त्यांच्या पथकातील पोलीस अंमलदार तेलंगे, अंगद कदम, रूपेश हासूळे, रविंद्र भुले, अमोल सुंडगे, धम्मा सोनकांबळे, गजानन गित्ते, यादव इवितवार (सर्व पोलीस ठाणे मुखेड) तसेच राजेंद्र सिटीकर (सायबर पोलीस ठाणे) यांनी ही यशस्वी कारवाई पार पाडली आहे.




## धर्मेंद्र प्रधानांच्या राजीनाम्यानंतर आता अभिजीत दिपके यांनी दादा भुसेंकडे मोर्चा वळवला

### राज्यातील शाळांची अवस्था पाहून नैतिक जबाबदारी स्वीकारून शिक्षणमंत्र्यांनी राजीनामा द्यावा, दिपकेंची मागणी

**लातूर (प्रतिनिधी)**– महाराष्ट्रातील शाळांची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. विद्यार्थ्यांना मूलभूत सुविधा मिळत नसतील, तर याची जबाबदारी नेमकी कोणाची?, असा सवाल उपस्थित करून शिक्षण व्यवस्थेची ही अवस्था पाहता राज्याचे शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा दिला पाहिजे, अशी प्रतिक्रिया कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अध्यक्ष अभिजीत दिपके यांनी दिली आहे.

लातूर जिल्ह्यातील औसा तालुक्यातील उजनी इथल्या जिल्हा परिषद शाळेला भेट दिल्यानंतर ते बोलत होते. शिक्षणमंत्र्यांनी आणि आमदारांनी स्वतःच्या मुलांना शिक्षणासाठी आधी जिल्हा परिषद शाळेत पाठविले पाहिजे, असेही ते म्हणाले.

महाराष्ट्रातील शाळांची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. विद्यार्थ्यांना मूलभूत सुविधा मिळत नसतील तर याची जबाबदारी नेमकी कोणाची असा सवाल उपस्थित करून शिक्षण व्यवस्थेची ही अवस्था पाहता राज्याचे शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा दिला पाहिजे, अशी प्रतिक्रिया अभिजीत दिपके यांनी दिली आहे.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

## मराठवाड्यावर पुन्हा दुष्काळाचे सावट

आकाशाकडे डोळे लावून बसलेल्या मराठवाड्यातील शेतकऱ्यांची प्रतीक्षा आता चिंतेत बदलली आहे. पावसाळ्याच्या महत्त्वाच्या काळात गेल्या पंधरा दिवसांपासून पावसाने दडी मारल्याने अनेक भागांतील पिके करपू लागली आहेत. सुरुवातीला समाधानकारक पाऊस झाल्याने शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या होत्या. मात्र, पावसाने अचानक पाठ फिरवल्याने त्या आशांवर पुन्हा संकटाचे ढग दाटले आहेत. अशीच परिस्थिती आणखी काही दिवस राहिली, तर मराठवाड्यात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. मराठवाड्याचे शेती अर्थकारण पूर्णपणे पावसाच्या लहरीवर अवलंबून आहे. सिंचनाची अपुरी साधने, भूजलपातळीतील घट आणि हवामानातील अनिश्चितता यामुळे येथील शेतकरी आधीच संकटाच्या चक्रात अडकलेला आहे. पेरणीच्या वेळी पावसाची प्रतीक्षा, पिके उभी राहिल्यानंतर पावसाचा खंड आणि काढणीच्या वेळी अतिवृष्टी, या तिन्ही परिस्थितींशी शेतकऱ्याला दरवर्षी सामना करावा लागतो. यंदाही त्याला वेगळे चित्र दिसत नाही. गेल्या पंधरा दिवसांपासून पाऊस नसल्याने सोयाबीन, कापूस, तूर, मूग, उडीद यांसह खरीप पिकांवर मोठा परिणाम होत आहे. जमिनीतील ओलावा कमी होत चालला आहे. काही ठिकाणी पिकांची वाढ खुंटली असून, पिके करपण्याची भीती निर्माण झाली आहे. पावसाने आणखी काही दिवस दडी मारल्यास उत्पादनात मोठी घट होऊ शकते. त्यामुळे शेतकऱ्यांसमोर केवळ पिके वाचविण्याचे नव्हे, तर संपूर्ण कुटुंबाचा उदरनिर्वाह टिकविण्याचे आव्हान उभे राहिले आहे. शेतकऱ्यांच्या संकटाचे स्वरूप केवळ 'आसमानी' नाही. त्याला 'सुलतानी' संकटाचाही सामना करावा लागतो. कधी पाऊस नाही, तर कधी अतिवृष्टी; कधी गारपीट, तर कधी अवकाळी पाऊस, निसर्गाच्या या लहरीपणासोबतच वाढता उत्पादन खर्च, महागडी बियाणे व खते, मजुरीचे वाढलेले दर, बाजारभावातील चढ-उतार आणि कर्जाचा वाढता बोजा यामुळे शेतकरी आर्थिकदृष्ट्या अक्षरशः पिचून निघत आहे. सर्वांत गंभीर प्रश्न म्हणजे या परिस्थितीची शासनाने वेळीच दखल घेतली आहे का? शेतकऱ्यांच्या शेतात पिके करपत असताना सरकारी यंत्रणा केवळ कागदोपत्री पाहणी करून थांबणार असेल, तर त्याचा उपयोग काय? पावसातील खंडाची तातडीने नोंद घेऊन तालुकानिहाय परिस्थितीचा आढावा घेणे, पिकांची पाहणी करणे, उपलब्ध पाण्याचे नियोजन करणे आणि गरजेनुसार शेतकऱ्यांना तातडीची मदत उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांच्या आत्म हत्या हा केवळ आकडेवारीचा विषय नाही. प्रत्येक आत्महत्येमागे एका कुटुंबाचे उद्‌ध्वस्त झालेले आयुष्य, मुलांचे भविष्य आणि अनेक वर्षांची कष्टाची कमाई असते. आर्थिक विवंचना, कर्जबाजारीपणा, पीकहानी आणि भविष्याबद्दलची अनिश्चितता यामुळे शेतकरी मानसिकदृष्ट्याही खचत आहे. अशा वेळी सरकारने संवेदनशीलतेने हस्तक्षेप करणे ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नाही, तर सामाजिक बांधिलकी आहे. मराठवाड्यावर दुष्काळाचे सावट गडद होण्याची वाट पाहण्याऐवजी संभाव्य संकटाचा सामना करण्यासाठी आतापासूनच तयारी करणे गरजेचे आहे. पिकांच्या नुकसानीचे वस्तुनिष्ठ पंचनामे, पीकविमा भरपाईची प्रक्रिया सुलभ करणे, शेतकऱ्यांना तातडीची आर्थिक मदत, चारा-पाणी नियोजन आणि आवश्यक ठिकाणी सिंचनाच्या पाण्याचे काटेकोर व्यवस्थापन यावर सरकारने भर द्यायला हवा. शेतकऱ्यांना आश्वासनांची खैरात नव्हे, तर प्रत्यक्ष मदतीची गरज आहे. संकटाच्या काळात शासन त्यांच्या पाठीशी उभे आहे, हा विश्वास निर्माण झाला पाहिजे. पाऊस कधी येईल, हे सरकारच्या हातात नाही; मात्र पाऊस दडी मारल्यावर शेतकऱ्याला एकटे पडू न देणे हे निश्चितच सरकारच्या हातात आहे. काही वर्षांपूर्वी असेच झाले असताना कृत्रिम पाऊस पडण्याचे प्रयोग झाले, परंतु त्यात अपेक्षित यश मिळाले नाही, खर्च मात्र झाला. तो प्रयोग आता केल्यास काही शेतकऱ्यांना दिलासा मिळू शकेल. याचाही विचार शासनाने करणे गरजेचे आहे. मराठवाड्यात दुष्काळाचे संकट गडद होण्यापूर्वी शासनाने जागे होणे ही काळाची गरज आहे, अन्यथा 'आसमानी' संकटासोबत 'सुलतानी' संकटही शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळत राहील.

## वनस्पतीजन्य दूध : आरोग्य, पर्यावरण आणि शाश्वततेचा संगम!



जागतिक वनस्पतीजन्य दूध दिवस दरवर्षी २२ ऑगस्ट रोजी साजरा केला जातो. या दिवसाचा उद्देश सोया, बदाम, ओट्स, नारळ, काजू, तांदूळ आणि वाटाणे यांसारख्या वनस्पतींपासून तयार होणाऱ्या दुधाच्या पर्यायांविषयी जनजागृती करणे हा आहे. वनस्पतीजन्य दूध हे पारंपरिक दुधाला पर्याय म्हणून वापरले जाऊ शकते. या दिवसाच्या माध्यमातून आरोग्यदायी आहार, पर्यावरणपूरक जीवनशैली आणि शाश्वत अन्नपद्धतींचे महत्त्व अधोरेखित केले जाते.

दूध म्हणजे फक्त पोषण नव्हे; ते आपल्या आरोग्याशी, पर्यावरणाशी आणि भविष्यातील अन्नव्यवस्थेशी जोडलेले आहे. पण जर दूधाची संकल्पना झाडांपासून, धान्यांपासून आणि कडधान्यांपासूनही साकारता आली तर?

आजच्या बदलत्या जीवनशैलीत वनस्पतीजन्य दूध हा केवळ पारंपरिक दुधाचा पर्याय राहिलेला नाही, तर आरोग्य, पर्यावरण आणि शाश्वत विकास यांचा विचार करणाऱ्या आधुनिक अन्नसंस्कृतीचा महत्त्वाचा भाग बनत आहे. सोयाबीन, बदाम, ओट्स, काजू, नारळ, तांदूळ आणि वाटाणे यांसारख्या वनस्पतींपासून तयार होणारे हे पर्याय आपल्यासमोर अनेक प्रश्नही उभे करतात हे आरोग्यासाठी किती उपयुक्त आहे? पर्यावरणावर त्याचा काय परिणाम होतो? आणि भविष्यातील पिढ्यांसाठी ही शाश्वत निवड ठरू शकते का? याच प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा आणि वनस्पतीजन्य दूध : आरोग्य, पर्यावरण आणि शाश्वततेचा संगम! हा विषय समजून घेण्याचा आज आपण प्रयत्न करणार आहोत.

वनस्पतीजन्य दूध म्हणजे सोयाबीन, बदाम, ओट्स, काजू, नारळ, तांदूळ आणि वाटाणे यांसारख्या वनस्पतींपासून तयार केलेले दूधासारखे पेय होय. हे पारंपरिक दुधाला पर्याय म्हणून वापरले जाते. विविध प्रकारांनुसार त्याची चव, पोत आणि पोषणमूल्य वेगवेगळे असते. आज वनस्पतीजन्य दुधाचा वापर चहा, कॉफी, स्मूदी, मिठाई आणि बेकरी पदार्थांमध्येही मोठ्या प्रमाणावर केला जातो. त्यामुळे आरोग्य, पर्यावरण आणि शाश्वततेच्या दृष्टीने वनस्पतीजन्य दूध महत्त्वाचे ठरत आहे.

वनस्पतीजन्य दूध हे आरोग्यदायी आहाराचा एक पर्याय ठरू शकते. सोया दुधामध्ये चांगल्या प्रमाणात प्रथिने असतात, तर काही वनस्पतीजन्य दुधांमध्ये कॅल्शियम, व्हिटॅमिन ऊ आणि इ१२ यांसारखी पोषकद्रव्ये समाविष्ट केलेली असतात. लॅक्टोज टाळू इच्छिणाऱ्या व्यक्तींसाठीही हे उपयुक्त ठरू शकते. मात्र सर्व प्रकारचे वनस्पतीजन्य दूध सारखे पौष्टिक नसते. त्यामुळे खरेदी करताना साखर, प्रथिने, कॅल्शियम आणि इतर पोषकद्रव्यांचे प्रमाण तपासून योग्य पर्याय निवडणे महत्त्वाचे आहे.

वनस्पतीजन्य दूध हे पर्यावरणपूरक आहाराचा एक महत्त्वाचा पर्याय मानला जातो. पारंपरिक दुग्धव्यवस्थेत जनावरांचे संगोपन, खाद्य, पाणी, जमीन आणि वाहतूक यांसारख्या संसाधनांचा मोठ्या प्रमाणावर वापर होतो. वनस्पतीजन्य दुधाचा पर्यावरणीय परिणाम मात्र वापरल्या जाणाऱ्या पिकावर आणि उत्पादन पद्धतीवर अवलंबून असतो. स्थानिक पिकांचा वापर, पाण्याचा कार्यक्षम वापर, कमी प्रक्रिया आणि पर्यावरणपूरक पॅकेजिंग यामुळे त्याचा पर्यावरणावरील परिणाम कमी करता येऊ शकतो. त्यामुळे वनस्पतीजन्य दूध हे आरोग्यासोबतच पर्यावरणीय शाश्वततेच्या दृष्टीनेही महत्त्वाचे ठरते.

वाढती लोकसंख्या आणि मर्यादित नैसर्गिक संसाधने लक्षात घेता, अन्ननिर्मितीत संसाधनांचा योग्य वापर करणे आवश्यक आहे. वनस्पतीजन्य दूध हे शाश्वत अन्नव्यवस्थेचा एक महत्त्वाचा पर्याय ठरू शकते. स्थानिक पिकांपासून वनस्पतीजन्य दूध तयार केल्यास स्थानिक शेतकऱ्यांना बाजारपेठ मिळण्यास मदत होते. तसेच उपलब्ध कृषी संसाधनांचा योग्य वापर करून अन्नाची नासाडी कमी करता येते. पर्यावरणपूरक पॅकेजिंग आणि पुनर्वापरयोग्य साहित्याचा वापर केल्यास पर्यावरणावरील भार आणखी कमी होऊ शकतो. त्यामुळे वनस्पतीजन्य दूध हे आरोग्याबरोबरच शाश्वत भविष्यासाठीही उपयुक्त पर्याय ठरू शकते. वनस्पतीजन्य दुधाची मागणी वाढल्यास सोयाबीन, ओट्स, तांदूळ, काजू, नारळ आणि इतर पिकांना चांगली बाजारपेठ मिळू शकते. स्थानिक पातळीवर वनस्पतीजन्य पेयांची निर्मिती केल्यास लघुउद्योग, प्रक्रिया उद्योग आणि रोजगाराच्या संधी वाढू शकतात. शेतमालावर प्रक्रिया करून त्याचे मूल्यवर्धन केल्याने शेतकऱ्यांना अतिरिक्त उत्पन्न मिळू शकते. मात्र, पिकांची निवड करताना स्थानिक हवामान, पाण्याची उपलब्धता आणि जैवविविधता यांचा विचार करणे आवश्यक आहे. त्यामुळे वनस्पतीजन्य दूध हे शेतकरी, उद्योग आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना देणारे माध्यम ठरू शकते.

वनस्पतीजन्य दूध हे विविध व्यक्तींसाठी उपयुक्त पर्याय ठरू शकते. लॅक्टोजचे पचन न होणाऱ्या व्यक्तींना काही वनस्पतीजन्य पेयांचा उपयोग होऊ शकतो. तसेच शाकाहारी किंवा पूर्णपणे वनस्पती-आधारित आहार घेणारे लोकही त्याचा वापर करू शकतात. पारंपरिक दुधाची चव किंवा पोत आवडत नसलेल्या व्यक्तींना सोया, बदाम, ओट्स, काजू अशा विविध पर्यायांमधून निवड करता येते. मात्र दूध किंवा एखाद्या घटकाची ॲलर्जी असल्यास उत्पादनावरील घटकांची माहिती काळजीपूर्वक तपासणे आवश्यक आहे.

वनस्पतीजन्य दूध खरेदी करताना केवळ चव किंवा किंमत न पाहता त्याचे पोषणमूल्य आणि घटक तपासणे महत्त्वाचे आहे. प्रथिने आणि कॅल्शियमचे प्रमाण योग्य आहे का, तसेच व्हिटॅमिन ऊ आणि इ१२ उपलब्ध आहेत का हे पाहावे. अतिरिक्त साखर कमी असलेले किंवा साखर नसलेले पर्याय निवडणे चांगले. संतृप्त चरबीचे प्रमाण, घटकांची यादी आणि ॲलर्जीची माहितीही काळजीपूर्वक तपासावी. यासोबतच पर्यावरणाच्या दृष्टीने पॅकेजिंग पुनर्वापरयोग्य आहे का याचाही विचार करणे योग्य ठरते. अशा प्रकारे माहितीपूर्ण निवड केल्यास आरोग्य आणि पर्यावरण दोन्हींचा विचार करता येतो.

वनस्पतीजन्य दूध दैनंदिन आहारात विविध प्रकारे वापरता येते. चहा आणि कॉफीमध्ये दुधाचा पर्याय म्हणून तसेच स्मूदी, मिल्कशेक, ओट्स आणि सीरियल यांसोबत त्याचा वापर करता येतो. सूप, सॉस आणि बेकरी पदार्थांना योग्य पोत देण्यासाठीही ते उपयुक्त ठरते. याशिवाय पुडिंग, खीर, मिठाई आणि विविध घरगुती पाककृतींमध्ये पारंपरिक दुधाऐवजी वनस्पतीजन्य दूध वापरता येते. त्यामुळे हे पेय केवळ एक पर्याय न राहता रोजच्या आहाराचा बहुउपयोगी भाग बनू शकते.

वनस्पतीजन्य दुधाबाबत अनेक गैरसमज आढळतात. सर्व वनस्पतीजन्य दूध समान पौष्टिक असते असे नाही, कारण प्रत्येक प्रकारातील प्रथिने, साखर, कॅल्शियम आणि इतर पोषकद्रव्यांचे प्रमाण वेगळे असते. तसेच वनस्पतीजन्य म्हणजे नेहमीच आरोग्यदायी असेही नाही; काही उत्पादनांमध्ये अतिरिक्त साखर किंवा इतर घटक अधिक असू शकतात. बदाम दूध म्हणजे त्यात भरपूर बदाम असतात, असेही आवश्यक नाही, कारण बदामाचे प्रमाण उत्पादनानुसार बदलते. त्याचप्रमाणे सर्व वनस्पतीजन्य दूध पर्यावरणासाठी समान चांगले असते असे म्हणता येत नाही. पिकाचा प्रकार, पाण्याचा वापर, शेतीची पद्धत, प्रक्रिया आणि वाहतूक यांचा पर्यावरणीय परिणाम वेगवेगळा असतो. त्यामुळे कोणताही पर्याय निवडताना माहिती तपासून आणि विचारपूर्वक निर्णय घेणे आवश्यक आहे.

भविष्यात वनस्पतीजन्य दुधाचे आणि वनस्पती-आधारित खाद्यपदार्थांचे विविध पर्याय अधिक प्रमाणात उपलब्ध होण्याची शक्यता आहे. स्थानिक पिकांवर आधारित नवीन उत्पादने आणि तंत्रज्ञान विकसित होऊ शकते, ज्यामुळे शेतकऱ्यांना नवीन बाजारपेठ मिळू शकते. कमी पाणी आणि कमी नैसर्गिक संसाधनांचा वापर करून उत्पादन करणाऱ्या पद्धतींना भविष्यात अधिक महत्त्व मिळेल. तसेच ग्राहकांच्या गरजा लक्षात घेऊन पोषणमूल्य, चव, परवडणारी किंमत आणि पर्यावरणीय परिणाम यांचा योग्य समतोल साधणारी उत्पादने विकसित होणे आवश्यक आहे. त्यामुळे वनस्पतीजन्य दूध हे भविष्यातील आरोग्यदायी, नाविन्यपूर्ण आणि शाश्वत अन्नव्यवस्थेचा महत्त्वाचा भाग ठरू शकते. वनस्पतीजन्य दूध दिवस आपल्याला आरोग्य, पर्यावरण, शेतकरी आणि भविष्यातील अन्नव्यवस्था यांचा समतोल साधण्याचा संदेश देतो. आरोग्यासाठी कोणतेही उत्पादन निवडताना त्याचे पोषणमूल्य जाणून घेणे आवश्यक आहे. पर्यावरणाच्या दृष्टीने नैसर्गिक संसाधनांचा जबाबदारीने वापर करून शाश्वत पर्यायांना प्रोत्साहन द्यावे. स्थानिक आणि शाश्वत पिकांना प्राधान्य दिल्यास शेतकऱ्यांना आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला मदत होऊ शकते. भविष्यासाठी पर्यावरणपूरक आणि संसाधनांचा कार्यक्षम वापर करणाऱ्या अन्नव्यवस्थेचा विचार करणे गरजेचे आहे. ग्राहक म्हणून केवळ आकर्षक जाहिरातींवर विश्वास न ठेवता उत्पादनाचे लेबल, घटक आणि वास्तविक पोषणमूल्य तपासून माहितीपूर्ण निवड करणे हा या दिवसाचा महत्त्वाचा संदेश आहे.

**वनस्पतीजन्य दूध :** आरोग्य, पर्यावरण आणि शाश्वततेचा संगम! हा केवळ एका पेयाचा विषय नसून तो आपल्या आहाराच्या निवडी, आरोग्य, नैसर्गिक संसाधनांचा वापर, शेतकऱ्यांचे भविष्य आणि पर्यावरणीय जबाबदारीशी जोडलेला आहे. योग्य पोषणमूल्य समजून, पर्यावरणाचा विचार करून आणि आपल्या गरजेनुसार वनस्पतीजन्य दुधाची निवड करणे महत्त्वाचे आहे. आजची जागरूक आणि योग्य निवड हीच उद्याच्या निरोगी व्यक्ती, समृद्ध शेतकरी आणि शाश्वत पर्यावरणाची पायाभरणी ठरू शकते.

**-डॉ. शिवराज कदम**
नांदेड
मो. ९७६७८३०४९८

## चळवळीतील एकनाथराव पावडे : एक निखळ माणूस काळाच्या पडद्याआड

शिवश्री एकनाथराव पावडे, सेवानिवृत्त उपआयुक्त, महाराष्ट्र वस्तू व सेवा कर विभाग, नांदेड. काही माणसांचे जाणे म्हणजे केवळ एका व्यक्तीचे निधन नसते; ते एका विश्वासाचे, एका आधाराचे आणि एका जिव्हाळ्याच्या नात्याचे हरपणे असते. नुकतेच शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झालेले, अत्यंत कर्तव्यनिष्ठ, मनमिळाऊ, सकारात्मक वृत्तीचे आणि चळवळीशी नाळ जपणारे शिवश्री एकनाथराव पावडे यांच्या आकस्मिक निधनाची वार्ता म्हणूनच मनाला चटका लावून जाणारी आहे. हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने त्यांचे अचानक निधन होणे ही त्यांच्या कुटुंबीयांसाठी, मित्रपरिवारासाठी आणि आपल्या चळवळीतील सहकाऱ्यांसाठी अत्यंत दुःखद आणि धक्कादायक घटना आहे.



एकनाथरावांचे जीवन पाहिले की त्यांच्या यशामागची संघर्षाची वाट अधिक ठळकपणे दिसून येते. २ फेब्रुवारी १९६८ रोजी नांदेड शहरालगत पावडेवाडी शेतकरी कुटुंबात जन्म झाला. अत्यंत प्रतिकूल आणि गरीब परिस्थितीतून त्यांनी शिक्षण घेतले. नांदेडच्या शामनगर येथील मराठा सेवा संघाच्या वसतिगृहात राहून त्यांनी शिक्षणाची वाट चालत आपल्या कर्तृत्वाने महाराष्ट्र वस्तू व सेवा कर विभागातील उप-आयुक्तपदापर्यंत मजल मारली. पाच महिण्यापूर्वीच सेवापुर्ती केलेले सेवानिवृत्त अधिकाऱ्यांचा सत्कार ७ ऑगष्ट २०२६ रोजी यशवंतराव चव्हाण मराठा वसतिगृह, नवा मोंढा, नांदेड येथे सपत्नीक मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला होता. त्यांच्या भाषणातील आठवणी आमच्या मनात ताज्या आहेत. त्यांच्या जीवनप्रवासात संघर्ष होता; पण त्या संघर्षाने त्यांना कठोर नव्हे, तर अधिक संवेदनशील, समंजस आणि माणुसकी जपणारा बनविले.

मराठा सेवा संघाशी त्यांचे नाते केवळ संस्थात्मक नव्हते, तर ते ऋणानुबंधाचे आणि कृतज्ञतेचे होते. वसतिगृहाने त्यांच्या आयुष्याला दिलेला आधार त्यांनी कधीही विसरला नाही. सेवा संघाच्या कार्यक्रमांना ते नियमित उपस्थित राहत. कार्यक्रमात केवळ उपस्थिती लावून ते थांबत नसत; तर आपल्या परीने सक्रिय सहभाग घेत, मदतीचा हात पुढे करीत आणि चळवळीतील कार्यकर्त्यांना प्रोत्साहन देत. पद, प्रतिष्ठा आणि शासकीय अधिकार असूनही त्यांच्या वागण्यात कधीही मोठेपणाचा अहंकार जाणवला नाही. उलट, साधेपणा आणि आपलेपणा हीच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची खरी ओळख होती.

आपण घडलो, तर आपल्या माणसांनीही घडले पाहिजे, ही त्यांच्या जीवनाची जणू भूमिका होती. स्वतःच्या पायावर उभे राहताना त्यांनी अनेक तरुणांनाही उभे राहण्याची प्रेरणा दिली. परिस्थिती कितीही कठीण असली तरी शिक्षण, कष्ट, आत्म-विश्वास आणि सकारात्मक विचारांच्या बळावर माणूस आपले आयुष्य बदलू शकतो, हा संदेश त्यांनी आपल्या कृतीतून दिला. शासकीय सेवेत मराठवाडा आणि विदर्भातील विविध ठिकाणी काम करताना त्यांनी केवळ नोकरी केली नाही, तर त्या-त्या ठिकाणच्या समाजाशी आणि माणसांशी आत्मीयतेचे संबंध निर्माण केले. सहकुटुंब त्या परिसरात राहून त्यांनी स्थानिक जीवनाशी एकरूप होण्याचा प्रयत्न केला. अधिकारी म्हणून कर्तव्य बजावताना माणूस म्हणून माणसांच्या सुख-दुःखात सहभागी होणे, ही त्यांची खासियत होती.

आपल्या गावाच्या विकासाचीही त्यांना तितकीच आस्था होती. माझं स्वप्न, माझं गाव हा उपक्रम त्यांनी राबवून गावाबद्दलची आपली बांधिलकी कृतीतून व्यक्त केली. गाव केवळ भौगोलिक सीमा नसते, तर आपल्या मुळांशी जोडणारी भावनिक भूमी असते, या जाणिवेतून त्यांनी गावासाठी काहीतरी करण्याचा प्रयत्न केला. स्वतः मोठ्या पदावर पोहोचल्यानंतरही आपल्या मातीशी असलेले नाते त्यांनी कधी तुटू दिले नाही. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे शिवधर्मावरील आस्था आणि वैचारिक बांधिलकी. वडिलांच्या अंत्यविधीचा विधी त्यांनी शिवधर्म पद्धतीने करून आपल्या विचारांशी असलेली निष्ठा कृतीतून दाखवून दिली. विचार केवळ बोलण्यासाठी नसतात; ते आचरणात आणण्यासाठी असतात, हे त्यांनी आपल्या जीवनातून सिद्ध केले. एकनाथराव पावडे हे आमच्या चळवळीतील केवळ सहकारी नव्हते; ते आधार देणारे, प्रोत्साहन देणारे आणि आपलेपणाने खांद्यावर हात ठेवणारे सहप्रवासी होते. त्यांच्याशी झालेल्या संवादात पदाचा दुरावा कधी जाणवला नाही. उलट, त्यांच्या बोलण्यातून आत्मीयता, अनुभवातून आलेली परिपक्वता आणि कृतीतून उमटणारी सकारात्मकता जाणवत असे.

नुकतेच सेवानिवृत्त होऊन आयुष्याच्या नव्या पर्वात प्रवेश करण्याच्या उंबरठ्यावर असताना काळाने त्यांना अचानक हिरावून नेले. सेवानिवृत्तीनंतर त्यांच्या अनुभवाचा, ऊर्जेचा आणि सामाजिक जाणिवेचा समाजाला मोठा लाभ झाला असता. गाव, चळवळ, तरुण पिढी आणि सामाजिक कार्यासाठी त्यांनी अजून बरेच काही करावे, अशा अनेक अपेक्षा त्यांच्या मित्रपरिवाराच्या मनात होत्या. मात्र नियतीपुढे माणसाचे सारे नियोजन अपुरे ठरते. आज त्यांच्या आठवणी डोळ्यांसमोर उभ्या राहतात आणि मनात एकच प्रश्न घुमतो. इतक्या लवकर निघून जाण्याची ही कोणती घाई होती? पण मृत्यू अंतिम असला तरी चांगल्या माणसांचे विचार, त्यांची माणुसकी आणि त्यांनी घडविलेली माणसे कधी मरत नाहीत. एकनाथरावांनी अनेकांच्या जीवनात आत्मविश्वास निर्माण केला, अनेकांना उभे राहण्याची प्रेरणा दिली आणि चळवळीशी असलेले नाते शेवटपर्यंत जपले. म्हणूनच ते देहाने आपल्यात नसले तरी त्यांच्या आठवणी, त्यांचे विचार आणि त्यांचे कार्य आपल्या सोबत कायम राहतील.

एकनाथराव पावडे यांना खरी श्रद्धांजली म्हणजे त्यांच्या जीवनातील संघर्ष, कृतज्ञता, सामाजिक बांधिलकी, सकारात्मकता आणि माणुसकी पुढे नेणे. त्यांनी ज्या तरुणांना उभे राहण्याची प्रेरणा दिली, त्या तरुणांनी समाजासाठी काहीतरी उभे करणे; त्यांनी ज्या गावाचे स्वप्न पाहिले, ते गाव अधिक सुंदर घडविण्यासाठी प्रयत्न करणे; आणि ज्या चळवळीशी त्यांनी आयुष्यभर नाते जपले, तिच्या मूल्यांना पुढे नेणेहीच त्यांच्या स्मृतींना खरी आदरांजली ठरेल.

शिवश्री एकनाथराव पावडे यांच्या जाण्याने चळवळीतील एक जिव्हाळ्याचा सहप्रवासी, समाजाशी नाते जपणारा अधिकारी आणि निखळ माणूस आपण गमावला आहे. परमेश्वर त्यांच्या दिवंगत आत्म्यास चिरशांती देवो आणि त्यांच्या कुटुंबीयांना, आप्तेष्टांना, मित्रपरिवाराला तसेच चळवळीतील सहकाऱ्यांना हे अपरिमित दुःख सहन करण्याचे बळ देवो. भावपूर्ण श्रद्धांजली..!

**-पंडित पवळे,**
नांदेड

## मानवतेला काळीमा फासणाऱ्या घटना थांबणार कधी?

पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यातील पिंपळवंडी येथे एका अल्पवयीन शाळकरी मुलीवर लैंगिक अत्याचार करून तिची हत्या केल्याची संतापजनक घटना नुकतीच घडली. या घटनेने पुणे जिल्हाच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. माणुसकीला काळिमा फासणाऱ्या या घटनेमुळे पुरोगामी महाराष्ट्राची प्रतिमा पुन्हा एकदा प्रश्नांकित झाली आहे. एका निष्पाप मुलीचे आयुष्य अशा प्रकारे संपवले जाणे ही केवळ एका कुटुंबाची शोकांतिका नसून संपूर्ण समाजाच्या संवेदनशीलतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी घटना आहे.

महाराष्ट्रात अशा घटना घडण्याची ही पहिलीच वेळ नाही. काही दिवसांपूर्वी महाराष्ट्र दिनी पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यातील नसरापूर येथे एका चार वर्षीय चिमुरडीवर लैंगिक अत्याचार करून तिची हत्या करण्यात आली होती. त्याच दिवशी चाकणजवळील महाळुंगे येथे एका अल्पवयीन मुलावर गंभीर लैंगिक अत्याचार करून त्याची हत्या झाल्याची घटना समोर आली होती. या दोन्ही घटनांनी महाराष्ट्र हादरून गेला होता. त्याआधी बदलापूरमधील शाळकरी मुलींवरील अत्याचाराच्या घटनेनेही राज्याच्या विवेकाला धक्का दिला होता. कोपर्डीची घटना तर आजही महाराष्ट्राच्या स्मरणात आहे.

पिंपळवंडी, नसरापूर, महाळुंगे, बदलापूर आणि कोपर्डी या घटना वेगवेगळ्या ठिकाणी घडल्या असल्या तरी त्यामागील विकृत मानसिकता आणि समाजासमोरील प्रश्न समान आहेत. या घटना केवळ गुन्हेगारीच्या घटना म्हणून पाहून चालणार नाही. महिला आणि बालकांच्या सुरक्षेबाबत आपण कुठे कमी पडत आहोत, याचा गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे.

पिंपळवंडीतील घटनेनंतर संतप्त नागरिक रस्त्यावर उतरले. आरोपीला कठोरात कठोर शिक्षा मिळावी, अशी मागणी होत आहे. पोलिसांनी आरोपीला तातडीने अटक केल्याने तपासाच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल उचलले गेले असले तरी नागरिकांचा संताप स्वाभाविकपणे कायम आहे. अशा प्रकरणांत आरोपीला अटक होणे ही सुरुवात आहे; न्याय मिळणे ही अंतिम कसोटी आहे. तपास निष्पक्ष, जलद आणि पुराव्यांवर आधारित असला पाहिजे आणि दोष सिद्ध झाल्यास आरोपीला कायद्यानुसार कठोर शिक्षा झाली पाहिजे. मात्र प्रत्येक वेळी घटना घडल्यानंतर आरोपीला अटक करणे, चौकशीचे आदेश देणे आणि कठोर शिक्षेची घोषणा करणे एवढ्यावरच शासनाची जबाबदारी संपत नाही. अशा घटना घडूच नयेत यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे अधिक महत्त्वाचे आहे. पोलिसांनी संवेदनशील भागात गस्त वाढवणे, शाळा व सार्वजनिक ठिकाणी सुरक्षा व्यवस्था मजबूत करणे, बालसुरक्षा यंत्रणा सक्षम करणे आणि महिलांच्या तक्रारींची तातडीने दखल घेणे आवश्यक आहे.

पिंपळवंडी प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर यापूर्वी गंभीर गुन्ह्यांत आरोपी असलेल्या व्यक्तींवर कायदेशीर प्रक्रियेनुसार योग्य देखरेख आणि प्रतिबंधात्मक उपाय झाले होते का, याचाही तपास झाला पाहिजे. गंभीर गुन्ह्यांच्या पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तींकडून पुन्हा गुन्हा घडू नये यासाठी संबंधित यंत्रणांनी काय उपाय केले, याची जबाबदारी निश्चित होणे गरजेचे आहे. एखाद्या यंत्रणेच्या निष्काळजीपणामुळे एखाद्या निष्पाप जीवाला किंमत मोजावी लागली असेल, तर त्या निष्काळजीपणावरही कठोर कारवाई झाली पाहिजे. कायद्याचा धाक निर्माण करण्यासाठी शिक्षा निश्चित होणे आणि ती वेळेत होणे अत्यंत आवश्यक आहे. मात्र केवळ कठोर शिक्षा हा या समस्येवरील एकमेव उपाय नाही. महिलांकडे आणि मुलींकडे व्यक्ती म्हणून नव्हे, तर उपभोग्य वस्तू म्हणून पाहणारी विकृत पुरुषी मानसिकता बदलणे तितकेच गरजेचे आहे. घर, शाळा आणि समाज या तिन्ही पातळ्यांवर मुलांना स्त्रीचा सन्मान, समानता, संमती आणि मानवी प्रतिष्ठेचे संस्कार दिले पाहिजेत. शिव, शाहू, फुले आणि आंबेडकरांच्या विचारांनी समृद्ध झालेल्या महाराष्ट्रात महिला आणि बालकांच्या सुरक्षेचा प्रश्न वारंवार निर्माण होणे ही निश्चितच चिंतेची बाब आहे. तीन-चार वर्षांच्या चिमुरडीपासून ते वृद्ध महिलेपर्यंत कोणतीही महिला किंवा मुलगी असुरक्षित वाटत असेल, तर आपण पुरोगामी असल्याचा दावा कितपत योग्य आहे, याचा विचार समाजाने करायला हवा. शाळा, महाविद्यालये, कामाची ठिकाणे, सार्वजनिक वाहतूक, सार्वजनिक ठिकाणे आणि घराच्या आसपास महिलांना सुरक्षित वातावरण मिळणे ही सरकारचीच नव्हे, तर संपूर्ण समाजाची जबाबदारी आहे. महिला सुरक्षेसाठी केवळ कायदे करून उपयोग नाही; त्या कायद्यांची प्रभावी अंमलबजावणीही झाली पाहिजे.



महाराष्ट्राची तुलना कोणत्याही राज्याशी करून आपली जबाबदारी झटकता येणार नाही. उलट महाराष्ट्राने महिला आणि बालसुरक्षेचे देशासमोर आदर्श उदाहरण निर्माण करणे गरजेचे आहे. गुन्हा घडल्यानंतर आरोपीला शिक्षा मिळणे आवश्यक आहेच; पण त्यापेक्षाही महत्त्वाचे म्हणजे गुन्हा घडण्यापूर्वी तो रोखणे. पिंपळवंडीतील निष्पाप मुलीला गमावल्याचे दुःख केवळ तिच्या कुटुंबाचे नाही, तर संपूर्ण महाराष्ट्राचे आहे. अशा प्रत्येक घटनेनंतर संताप व्यक्त करून काही दिवसांनी सर्व विसरून जाण्याची मानसिकता आता बदलली पाहिजे. या घटनांच्या मुळाशी जाऊन विकृत मानसिकता, कायद्याची अंमलबजावणी आणि सुरक्षा यंत्रणेतील त्रुटी दूर करण्यासाठी ठोस पावले उचलली पाहिजेत. महाराष्ट्र खऱ्या अर्थाने पुरोगामी तेव्हाच म्हणता येईल, जेव्हा या भूमीवर जन्मलेली प्रत्येक मुलगी निर्भयपणे शाळेत जाईल, सुरक्षितपणे घरी परतेल आणि प्रत्येक महिला सन्मानाने जगू शकेल. मानवतेला काळिमा फासणाऱ्या घटना थांबविण्यासाठी सरकार, पोलीस, न्यायव्यवस्था आणि समाजाने आता केवळ आश्वासने नव्हे, तर ठोस कृती करण्याची वेळ आली आहे.

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# सामाजिक कार्याच्या क्षेत्रात स्वारातीम विद्यापीठ आणि भटके विमुक्त विकास प्रतिष्ठान यांच्यात सामंजस्य करार



**नांदेड (प्रतिनिधी)–** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ आणि भटके विमुक्त विकास प्रतिष्ठान, सोलापूर यांच्या सामाजिक कार्य, क्षेत्रीय अध्ययन, संशोधन व विद्यार्थ्यांच्या व्यावहारिक प्रशिक्षणाला चालना देण्यासाठी गुरुवार, दि.२० ऑगस्ट २०२६ रोजी सामंजस्य करार करण्यात आला.

या सामंजस्य करारावर स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्यावतीने कुलसचिव डॉ. डी. डी. पवार आणि भटके विमुक्त विकास प्रतिष्ठानच्या वतीने अध्यक्ष उद्धवराव विश्वनाथ काळे यांनी स्वाक्षऱ्या केल्या.

यावेळी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. प्रशांत पेशकार, प्रेमानंद शिंदे, उमेश जोशी, सामाजिकशास्त्रे संकुलाचे संचालक डॉ. प्रमोद लोणकर तसेच नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. शैलेश वाढेर उपस्थित होते.

यावेळी बोलताना कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी सांगितले की, या सामंजस्य करारामुळे एमएसडब्ल्यूच्या विद्यार्थ्यांना वर्गातील सैद्धांतिक ज्ञान प्रत्यक्ष क्षेत्रीय अनुभवाशी जोडण्याची महत्त्वपूर्ण संधी मिळणार आहे. Fieldwork, One Month Block Placement, Guest Lectures आणि Joint Research Projects यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना भटके व विमुक्त समाजाच्या वास्तविक समस्या, त्यांच्या गरजा आणि विकासाच्या आव्हानांचा जवळून अभ्यास करता येईल. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सामाजिक संवेदनशीलतेसोबतच त्यांच्या संशोधन, संवाद, नेतृत्व आणि समस्या-निराकरणाच्या कौशल्यांचा विकास होईल.

या सामंजस्य करारांतर्गत सामाजिक शास्त्रे संकुलातील सामाजिक विज्ञान व आंतरविद्या शाखेच्या Master of Social Work (MSW) प्रथम व द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी विविध शैक्षणिक व क्षेत्राधारित उपक्रम राबविण्यास सहकार्य केले जाणार आहे. यामध्ये Fieldwork, One Month Block Placement, Guest Lecture आणि गेळपीं Research Project यांसह करारातील उद्देशांशी संबंधित विविध उपक्रमांचा समावेश करण्यात येणार आहे.

विद्यार्थ्यांना भटके व विमुक्त समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि विकासात्मक प्रश्नांना प्रत्यक्ष क्षेत्रात अभ्यास करता येणार आहे. तसेच सामाजिक कार्याच्या व्यावहारिक ज्ञानाला संशोधनाची जोड मिळेल. या उपक्रमातून प्रमुख उद्दिष्टांबरोबरच विद्यार्थ्यांच्या क्षेत्रीय साधने आणि प्रतिष्ठानचा क्षेत्रीय अनुभव यांचा समन्वय साधून विद्यार्थ्यांच्या कौशल्यविकासासाठी तसेच समाजाभिमुख संशोधनाला प्रोत्साहन मिळणार आहे.

## नांदेड परिमंडलात ११८१ जणांची वीज चोरी उघड

**नांदेड (प्रतिनिधी)-** विजेची वितरण व वाणिज्यक हानी कमी करून ग्राहकांना अखंडित आणि सुरळीत वीज पुरवठा करण्यासाठी महावितरणतर्फे वीज चोरीविरुद्ध कारवाई करण्यात येते. एप्रिल ते जुलै २०२६ अखेरपर्यंत नांदेड परिमंडलातील नांदेड, परभणी आणि हिंगोली जिल्ह्यात भारतीय विद्युत कायदा २००३ च्या कलम १२६ व १३५ अन्वये ११८१ वीज चोरांवर कारवाया करुन ९४ जणांविरुध्द पोलिसांत गुन्हे दाखल करण्यात आले.

मागील चार महिन्याच्या कालावधीत महावितरणकडून परिमंडलात विद्युत तारेवर आकडे टाकून अनधिकृतपणे चोरून वीज वापरणे, मीटरमध्ये फेरफार करून वीज चोरी करणे प्रकरणी ११८१ वीज चोरांविरुध्द कारवाई करण्यात आली. चोरून केलेल्या वीज वापराचे १.५२ कोटी रुपयांचे वीज बिलही त्यांना आकारण्यात आले आहे. शिवाय, वीज चोरीप्रकरणी नांदेड जिल्ह्यात ३०, परभणीत ६३ तर हिंगोलीमध्ये एकाविरुध्द पोलिसात फौजदारी कारवाईही करण्यात आलेली आहे.

वीज चोरीप्रकरणी आकारण्यात आलेल्या संपूर्ण रकमेचा दंडासह मुदतीत भरणा न करणाऱ्या वीज चोरांविरुध्द भारतीय विद्युत कायदा कलम १३५ नुसार फौजदारी कारवाई करण्यात येते. कलम १३५ नुसार वीज चोरीच्या गुन्ह्यासाठी आर्थिक दंडासह तीन वर्षापर्यंतच्या तुरुंगवासाच्या शिक्षेची तरतूद आहे.

# निरपेक्ष व सखोल पोलीस तपास हा न्याय व्यवस्थेचा पाया आहे –ॲड. डॉ. भीमराव हाटकर

**नांदेड (प्रतिनिधी)–** अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यातील गुन्ह्यांच्या दोषसिद्धीकरिता प्रामाणिक, निरपेक्ष व सखोल पोलीस तपास हा महत्त्वपूर्ण असून असा तपास हा संपूर्ण न्याय व्यवस्थेचा मजबूत पाया आहे, असे प्रतिपादन विधिज्ञ डॉ. भीमराव हाटकर यांनी येथील पोलीस अधिकारी यांच्यासाठी आयोजित कार्यशाळेत बोलताना केले. यावेळी अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव यांचीही उपस्थिती होती.

नागरी हक्क संरक्षण विभाग, परिक्षेत्र नांदेड व डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने पोलीस उपविभागीय अधिकारी व सहायक तपासणी अंमलदार, पोलीस निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक व सहायक पोलीस निरीक्षक यांच्या तपास कामातील ज्ञान व कौशल्यवृद्धीसाठी सदर प्रशिक्षण तथा कार्यशाळेचे आयोजन पोलीस अधीक्षक कार्यालयातील मंथन हॉल येथे करण्यात आले होते. कार्यशाळेचे उद्घाटन जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या हस्ते झाले. ही कार्यशाळा अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती कायद्याच्या तरतुदी समजून घेण्यासाठी अत्यंत आवश्यक आणि महत्त्वपूर्ण असल्याने उपस्थित



सर्व अधिकाऱ्यांनी गांभीर्यपूर्वक कार्यशाळेतील व्याख्यात्यांचे ज्ञान व अनुभव ग्रहण करावा, असे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले.

कार्यशाळेला समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त शिवानंद मिनगिरे, नागरी हक्क संरक्षणचे पोलीस उपाधीक्षक डॉ. अभिजीत पाटील हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. कार्यशाळेला विषयतज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून ॲड. डॉ. भीमराव हाटकर व सेवानिवृत्त सहसंचालक तथा सरकारी अभियोक्ता ॲड. सुनंदा चावरे ह्या उपस्थित होत्या.

उपस्थित पोलीस अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना ॲड. डॉ. भीमराव हाटकर पुढे म्हणाले की, सदर कायदा हा सामाजिक स्वरूपाचा असून तो विशेष कायदा आहे. या कायद्यांतर्गत घडणारे गुन्हे हे सामाजिक द्वेषातून आणि घृणेतून घडत असतात. तपासणी करणारा अधिकारी जर जातवर्चस्वाच्या पूर्वग्रहाने दूषित असेल तर पीडिताला कधीही न्याय मिळणार नाही. आज सर्वत्र सदर कायद्याचा दुरूपयोग होत असल्याचे नेरेटिव्ह सेट झालेले दिसून येत आहे. याला न्यायव्यवस्थादेखील बळी पडत आहे. त्यामुळे सदर कायद्यांतर्गत गुन्ह्यामध्ये दोषसिद्धीचे प्रमाण महाराष्ट्रात गेल्या अनेक वर्षात केवळ आठ ते दहा टक्के इतके अत्यल्प आहे. ही बाब तपासयंत्रणा आणि न्याययंत्रणेलाही भूषणावह निश्चितच नाही.

यावेळी डॉ. अभिजीत पाटील, शिवानंद मिनगिरे यांनीही विचार मांडले. तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नागरी हक्क संरक्षण विभागाचे पीएसआय विजय मिटपल्ले यांनी तर आभार रियाज शेख सहाय्यक पोलीस निरीक्षक यांनी मानले. कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी नागरी हक्क संरक्षण विभागाच्या पोलीस निरीक्षक सुनिता शिंदे, एपीआय अंकुशकर, एपीआय श्रीराम जामगे, एएसआय हाटकर, गीता कांबळे, मनोज पाटील, मुलगीर, फारूक शेख, मुरकुटे, इप्पर, पोकलवार, पवन हेसे, हर्षवर्धन गवळी, सुयोग गडम यांनी परिश्रम घेतले.

# अनुसूचित जमाती कल्याण समितीला दिले कोळी महासंघाच्या शिष्टळमंडळाने निवेदन



**नांदेड (प्रतिनिधी)–** अनुसूचित जमाती कल्याण समिती नांदेड दौऱ्यावर आली असता शासकीय विश्रामगृह नांदेड येथे शंकर मनाळकर यांच्या अध्यक्षतेखाली अनुसूचित जमातीचे निवेदन देऊन समिती अध्यक्ष दौलत दरोडा व इतर आ. महोदय व तसेच समिती सदस्य यांची भेट घेऊन पुराव्यासहित अगदी इंग्रज काळापासून ते आजतागायत अशा स्वरूपाचे निवेदन छत्रपती संभाजी नगर व किनवट जमात पडताळणी समिती हेतुपुरस्सर महादेव कोळी प्रमाणपत्र अवैध करण्यात येत असल्याबाबत निवेदन देण्यात आले.

कोळी महासंघाचे मराठवाडा अध्यक्ष शंकर मनाळकर यांच्या नेतृत्वाखाली के. एन. जेटेवाड, सेवानिवृत्त पोलीस अधिकारी पुंडलिकराव बोन्डलेवाड, शिवाजी गलांडे, बोईनवाड, राम मालेवाड रुईकर, बालाजी काजलवाड, ॲड. प्रशान्त जगताप, ॲड.जेटेवाड मॅडम, मामीलवाड शंकपाळे, राजू पिंगळवाड, डी. डी. बोईनवाड, अनिल मोरे, आनंदा रेजितवाड यांच्यासह समाजबांधवांनी अनुसूचित जमाती कल्याण समितीला मागण्यांचे निवेदन सादर केले.

कोळी महासंघाच्या शिष्टमंडळाचे म्हणणे ऐकून घेऊन अनुसूचित जमाती कल्याण समितीने सकारात्मक विचार करू, अशी ग्वाही दिली.

# पोक्सो कायद्याची ओळख व मार्गदर्शन कार्यक्रम उत्साहात संपन्न

**नांदेड (प्रतिनिधी)–** बालपणाला हवी सुरक्षिततेची साथ, जागृतीने उजळू दे प्रत्येकाची वाट; कायद्याचे ज्ञान देईल संरक्षणाची दिशा, सजग समाजात फुलेल सुरक्षिततेची आशा! या प्रेरणादायी संदेशातून विद्यार्थ्यांमध्ये बालकांच्या सुरक्षिततेविषयी जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने पीपल्स कनिष्ठ महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाच्या वतीने 'सुरक्षित बालपण सजग समाज!' या विषयावर पोक्सो कायद्याची ओळख व मार्गदर्शन कार्यक्रम नुकताच पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विकास सुकाळे होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून मराठी विभागातील प्रा. कल्पना जाधव आणि राज्यशास्त्र विभागातील प्रा. डॉ. सुप्रिया गायकवाड यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत पोक्सो कायद्याविषयी सखोल, संवेदनशील आणि मार्गदर्शक विचार मांडले. यावेळी कार्यकारिणी सदस्य प्रा. विलास वडजे यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रास्ताविकातून प्राचार्य डॉ. विकास सुकाळे यांनी कायद्याचे ज्ञान हे केवळ परीक्षेपुरते मर्यादित न राहता सुरक्षितता, अधिकार आणि जबाबदारीची जाणीव करून देणारे प्रभावी माध्यम असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांनी स्वतःच्या तसेच इतरांच्या सुरक्षिततेला आणि सन्मानाला प्राधान्य देत शिक्षण, ध्येय व भविष्यातील स्वप्नांवर लक्ष केंद्रित करावे, असे आवाहन त्यांनी केले.

प्रा. डॉ. सुप्रिया गायकवाड यांनी पोक्सो कायद्याची आवश्यकता, बालकांना लैंगिक शोषणापासून संरक्षण देण्यातील त्याचे महत्त्व आणि बालकांशी संबंधित कायदेशीर तरतुदी याविषयी मार्गदर्शन केले. विशेषतः सोशल मीडियावरील अनोळखी व्यक्तींशी संवाद, ऑनलाइन ओळखी आणि त्यातून निर्माण होणाऱ्या संभाव्य धोक्यांबाबत विद्यार्थ्यांनी सजग व विवेकी राहण्याचा संदेश त्यांनी दिला.

प्रा. कल्पना जाधव यांनी 'स्वीटी' या काल्पनिक पत्राच्या माध्यमातून कथात्मक आणि भावनिक शैलीत विद्यार्थ्यांशी संवाद साधला. चुकीच्या निर्णयांचे भावनिक व कौटुंबिक परिणाम प्रभावीपणे मांडत त्यांनी विद्यार्थ्यांनी शिक्षण, खेळ, आनंद, संस्कार आणि सुरक्षितता यांना जीवनात योग्य स्थान द्यावे, असा संदेश दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. विजय कदम यांनी केले, तर आभार प्रा. डॉ. माया भालेराव यांनी मानले.

यावेळी डॉ. एस. बी. माळी, डॉ. पूनम लोहाना, डॉ. आम्रपाली कसबे, डॉ. शीतल मरवळीकर, प्रा. संतोष कांबळे, प्रा. डॉ. विनोद चव्हाण, प्रा. किरण बिचकुंदे, प्रा. आदित्य गोडबोले, प्रा. पी. पी. चौधरी, प्रा. डॉ. विनायक देव, प्रा. जी. डी. ताडोड यांच्यासह कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कायद्याची माहिती, सुरक्षिततेची जाणीव आणि सजगतेचा संदेश देणारा हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक व समाजजागृतीच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरला.

## उद्या तेली समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**अर्धापूर (प्रतिनिधी)–** तेली समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा व विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मान्यवरांचा सत्कार दि. २३ ऑगस्ट रोजी प्रतिभा निकेतन कॉलेज सभागृह, बंदाघाट रोड, वजीराबाद नांदेड येथे आयोजित केला आहे.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील गुणवंत विद्यार्थ्यांनी आपल्या गुणपत्रकाच्या माहितीची प्रत सदरील ग्रुपवर टाकून त्याखाली आपले नाव,वर्ग कळवावे. नोंदणी करण्यासाठी गुगल फॉर्मची लिंक देण्यात येईल, असे कळविण्यात आले आहे. अर्ज भरल्यानंतर आपले प्रमाणपत्र व फॉर्म भरलेला स्क्रीन शॉट ग्रुपवर टाकावा, असे आवाहन तेली समाज सेवाभावी संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

# महापालिकेत सद्भावना दिवस साजरा



**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतर्फे गुरुवार, दि. २० ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता स्थायी समिती सभागृह येथे माजी पंतप्रधान स्व. राजीव गांधी यांची जयंती साजरी करण्यात आली.

यावेळी राजीव गांधी यांच्या प्रतिमेस महापौर कविता मुळे आणि मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी राष्ट्रीय एकात्मता आणि शांततेची शपथ घेतली.

यावेळी अतिरिक्त आयुक्त निलेश सुंकेवार, अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम, उपायुक्त नितीन गाढवे, उपायुक्त अजितपालसिंघ संधु, उपायुक्त गंगाधर ईरलोड, मुख्य लेखा व वित्त अधिकारी धनराज पांडे, मुख्य लेखा परीक्षक आनंद ऐनवाड, सहायक आयुक्त मनीषा नरसाळे यांच्यासह मनपाचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या खुनाचा सूत्रधार शोधण्याबाबत अंनिस व समविचारी संघटनेतर्फे जिल्हाधिकारी यांना निवेदन

**नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या खुनाचा सूत्राधार शोधून तत्काळ कारवाई करावी, अशी मागणी करणारे निवेदन अंनिस व समविचारी संघटनेच्यावतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन सादर करण्यात आले.

जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक कार्याध्यक्ष डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या निर्घृण खुनाला २० ऑगस्ट रोजी १३ वर्षे पूर्ण होत आहेत. डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या खुनाचा तपास सीबीआय करत होती. सीबीआयने तपास



करून त्याविषयी खटला पुणे विशेष न्यायालयात दाखल केला होता. 'डॉ नरेंद्र दाभोळकरांचा खून हा त्यांचे विचार संपविण्यासाठी केलेला एक सुनियोजित कट होता' असे निरीक्षण पुणे येथील सत्रन्यायालयाने नोंदविले असतानादेखील त्यामागचे सूत्रधार शोधण्यासाठी शासन काहीही प्रयत्न करत नाही. या खुनामागचे सूत्रधार अजूनही मोकाटच आहेत. त्यांना पकडण्याचे कुठलेही प्रयत्न शासनाच्या पातळीवर सुरु नाहीत.

दुसरी बाब म्हणजे या विषयी सी.बी.आय.ने उच्च न्यायालयामध्ये दाद मागितली नाही, ही अक्षम्य दिरंगाई आहे. सी.बी.आय.ने तातडीने उच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल करावी. तसेच देशभरातल्या वाढत्या बुवाबाजीच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर जादूटोणा विरोधी कायदा देशभरात लागू करावा अशी मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली.

या निवेदनावर अंनिसचे राज्य कार्यकारी समिती सदस्य इंजि. सम्राट हटकर, डॉ. एस. बी. राठोड, डॉ. सारिका, प्रा. डॉ. संग्राम पंडित, दत्ता तुमवाड, आरपीआयचे जिल्हाध्यक्ष भगवान ढगे, विठ्ठल भंडारे, प्रा. नागनाथ गिरगावकर, अब्दुल कादिर, इंजिनीयर नागराज मक्किताय, आर. एम. मुंगल, जी. एम. पवार आदी कार्यकर्त्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# महाराष्ट्रातील मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षणाचे सुधारित वेळापत्रक जाहीर

**नांदेड (प्रतिनिधी)–** भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्रातील विधानसभा मतदारसंघांच्या मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षणाचा सुधारित कार्यक्रम जाहीर केला आहे. १ ऑक्टोबर २०२६ ही पात्रता तारीख निश्चित करून राबविण्यात येणाऱ्या या प्रक्रियेत मतदान केंद्रांचे सुसूत्रीकरण आणि प्रारूप मतदार याद्या तयार करण्यासंबंधीची तांत्रिक प्रक्रिया पूर्ण करण्याच्या उद्देशाने वेळापत्रकात ही सुधारणा करण्यात आली आहे.

सुधारित वेळापत्रकानुसार मतदान केंद्रांचे सुसूत्रीकरण व पुनर्रचना २४ ऑगस्ट २०२६ पर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे. त्यानंतर ३१ ऑगस्ट २०२६ रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

प्रारूप मतदार यादीसंदर्भात ३१ ऑगस्ट ते ३० सप्टेंबर २०२६ या कालावधीत दावे व हरकती दाखल करता येऊ शकतील. तसेच ३१ ऑगस्ट ते २९ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत प्राप्त दावे व हरकतींबाबत नोटीस देणे तसेच त्यांचा निपटारा करण्यात येईल.

या संपूर्ण प्रक्रियेनंतर महाराष्ट्रातील अंतिम मतदार यादी ४ नोव्हेंबर २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे, असे भारत निवडणूक आयोगाने कळविले आहे.

# उमरी तालुका संजय गांधी निराधार योजनेच्या बैठकीत १५३ अर्ज मंजूर



**उमरी (प्रतिनिधी)–** संजय गांधी निराधार योजना उमरी तालुका समितीची बैठक दि. १५ ऑगस्ट रोजी तहसील कार्यालय उमरी येथे पार पडली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी समितीचे अध्यक्ष डॉ. विक्रम देशमुख यांची उपस्थिती होती.

या बैठकीस समितीच्या सदस्य सचिव तथा तहसीलदार श्रीमती मंजुषा भगत यांची प्रमुख उपस्थिती होती. या बैठकीत उमरी तालुक्यातील १५३ पात्र लाभार्थ्यांचे प्रस्ताव मंजूर करण्यात आले तर ४० प्रस्ताव त्रुटीत असल्या कारणाने त्रुटी पुर्ततेसाठी ठेवण्यात आले. या बैठकीत समितीच्या सदस्या नगर परिषदेच्या मुख्याधिकारी श्रीमती सोनाली बनस्वाल, नायब तहसीलदार संजय सोलंकर, पंचायत समितीचे विस्तार अधिकारी इंगुलवार, समितीचे सदस्य सौ प्रणिता जोशी, पोषाट्टी नवोड, साहेबराव तुरेराव, मारोती वाघमारे, स. महसूल सहायक गंगाधर टेंभुर्णीवार, महसूल सहायक अशोक कस्तुरे, संगणक ऑपरेटर धनंजय बोधनकर आदी पस्थित होते.

संजय गांधी निराधार योजना आ. राजेश पवार यांच्या मार्गदर्शनाखाली व पारदर्शकपणे राबविण्या येऊन गरजूंना प्राधान्य दिले जाते. लाभार्थ्यांनी आपले प्रस्ताव सेतू सेवा केंद्रमार्फत ऑनलाईन करावेत व ऑफ लाईन पद्धतीने एक प्रत तहसील कार्यालयातील संगायो विभागात दाखल करावी. कुठलीही अडचण येत असल्यास महसूल सहायक अशोक कस्तुरे व संगणक ऑपरेटर धनंजय बोधनकर यांना संपर्क साधावा. इतरांच्या भूलथापांना बळी पडू नये, असे आवाहन समितीचे अध्यक्ष डॉ. विक्रम देशमुख यांनी केले आहे.

# 'यशवंत' मध्ये प्राणिशास्त्र पदवी विभागाचा इंडक्शन कार्यक्रम उत्साहात संपन्न

**नांदेड (प्रतिनिधी)–** यशवंत महाविद्यालयातील प्राणिशास्त्र विभागाच्या वतीने बी.एस्सी. प्राणिशास्त्र विषयाच्या नव्याने प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी इंडक्शन कार्यक्रम घेण्यात आला.

माजी प्र-कुलगुरू तथा प्राचार्य डॉ. गणेशचंद्र एन. शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना प्राणिशास्त्र विषयाची व्याप्ती, अभ्यासक्रमाची वैशिष्ट्ये, अध्यापन-अध्ययन प्रक्रिया, परीक्षा पद्धती, सहशैक्षणिक व अतिरिक्त- अभ्यासक्रमीय उपक्रम तसेच उच्च शिक्षण आणि करिअरच्या विविध संधींबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

प्रारंभी प्राणिशास्त्र विभाग प्रमुख डॉ. संजय नंनवरे यांनी प्रास्ताविक केले. त्यांनी विभागाची शैक्षणिक वाटचाल, अभ्यासक्रमाची वैशिष्ट्ये, अध्यापनाच्या विविध पद्धती तसेच



उच्च शिक्षण व रोजगाराच्या उपलब्ध संधींची माहिती दिली. बदलत्या काळानुसार विषयातील अद्ययावत ज्ञान, तांत्रिक कौशल्ये आणि संशोधनवृत्ती विकसित करण्याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले.

सायन्स कॉलेज, नांदेड येथील फिशरीज विभागप्रमुख डॉ. किरण शिल्लेवार प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. त्यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, प्राणिशास्त्र विषयाचे बदलते स्वरूप, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि भविष्यातील करिअरच्या विविध संधींबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. संशोधन, जैवतंत्रज्ञान, पर्यावरण, वन्यजीव संवर्धन, मत्स्यव्यवसाय, प्रयोगशाळा तंत्रज्ञान, अध्यापन तसेच विविध शासकीय व खासगी क्षेत्रांमध्ये प्राणिशास्त्राच्या विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असलेल्या संधी स्पष्ट केल्या.

केवळ पदवी संपादन करण्यापुरते शिक्षण मर्यादित न ठेवता कौशल्यविकास, संशोधनवृत्ती, आधुनिक तंत्रज्ञान आणि विषयाचे व्यावहारिक ज्ञान यांची सांगड घालून विद्यार्थ्यांनी आपल्या करिअरची दिशा निश्चित करावी, असे आवाहन डॉ. शिल्लेवार यांनी केले.

याप्रसंगी डॉ. एच. एल. तमलूरकर, डॉ. एम. एस. कदम आणि डॉ. डी. बी. भुरे यांनी महाविद्यालयातील अध्यापन-अध्ययन प्रक्रिया, सहशैक्षणिक व अतिरिक्त-अभ्यासक्रमीय उपक्रम, परीक्षा पद्धती तसेच स्पर्धात्मक परीक्षांबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. नियमित वर्गातील अध्यापनासोबत प्रात्यक्षिके, प्रकल्प, चर्चासत्रे आणि विविध शैक्षणिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन त्यांनी केले. परीक्षेचे स्वरूप, मूल्यमापन पद्धती, अभ्यासाचे नियोजन आणि सातत्यपूर्ण तयारी याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले. एमपीएससी, यूपीएससी, विविध प्रवेश परीक्षा आणि इतर स्पर्धात्मक परीक्षांची तयारी पदवीच्या सुरुवातीपासूनच नियोजनबद्ध पद्धतीने करण्याचा सल्लाही देण्यात आला.

याप्रसंगी डॉ. एच. एल. तमलूरकर, डॉ. एम. एस. कदम, डॉ. नीताराणी जयस्वाल, डॉ. धनराज भुरे, प्रा. साहेबराव माने, प्रा. नारायण गव्हाणे, डॉ. दीप्ती तोटावार आणि डॉ. रोहिणी चव्हाण यांनी सहकार्य केले.

सूत्रसंचालन, प्रमुख वक्त्यांचा परिचय आणि आभार प्रदर्शन प्रा. साहेबराव माने यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राजू भोसले, शंकर मिरेवाड, परमेश्वर राठोड आणि जगदीश उमरीकर, प्रसिद्धी समन्वयक डॉ. अजय गव्हाणे, प्रबंधक संदीप पाटील, अधीक्षक कालिदास बिरादार, गजानन पाटील आणि जगन्नाथ महामुने आदींनी सहकार्य केले.

फॅशन | संसार | सौंदर्य
सखी

# भजे तेलकट होण्याची 3 प्रमुख कारणे!

## कुरकुरीत पकोडे बनवण्याची योग्य पद्धत जाणून घ्या...

**पावसाळा असो किंवा संध्याकाळची चहाची वेळ, गरमागरम पकोडे (भजे) खाण्याची मजा काही औरच असते. मात्र अनेकदा पकोडे इतके तेलकट होतात की त्यांची चव आणि कुरकुरीतपणा दोन्ही कमी होतात. पकोडे तेल शोषतातच असे नाही; ते बनवताना होणाऱ्या काही छोट्या चुका त्यांना अधिक तेलकट बनवतात. तेलाचे योग्य तापमान न राखणे, कढईत एकाच वेळी जास्त पकोडे सोडणे किंवा तळल्यानंतर पकोडे लगेच झाकून ठेवणे, या चुका पकोड्यांचा कुरकुरीतपणा घालवू शकतात. घरच्या घरी हलवाईसारखे कुरकुरीत आणि कमी तेल शोषणारे पकोडे बनवायचे असतील, तर या चुका टाळणे महत्त्वाचे आहे.**



» कमी तापमानाच्या तेलात पकोडे तळणे : पकोडे तळण्यासाठी तेल पुरेसे गरम असणे अत्यंत आवश्यक आहे. तेल कमी तापलेले असल्यास ते कुरकुरीत होत नाहीत. पकोड्यांचे पीठ बराच वेळ तेलाच्या संपर्कात राहते आणि ते अधिक तेल शोषू लागते. त्यामुळे पकोडे तळताना तेल साधारण १७० ते १८० अंश सेल्सिअस तापमानापर्यंत गरम असावे. त्यानंतरच पकोडे तेलात सोडावेत.

» कढईत एकाच वेळी जास्त पकोडे सोडणे : वेळ वाचवण्याच्या प्रयत्नात अनेक जण कढईत एकाच वेळी मोठ्या प्रमाणात पकोडे सोडतात. मात्र असे केल्याने गरम तेलाचे तापमान अचानक कमी होते. तेलाचे तापमान कमी झाल्यानंतर पकोडे व्यवस्थित तळण्याऐवजी अधिक तेल शोषू लागतात आणि तेलकट होतात. त्यामुळे कढईच्या आकारानुसार थोडे-थोडे पकोडे तळणे योग्य ठरते.

» तळल्यानंतर पकोडे लगेच टिश्यू पेपरवर ठेवणे : तेलातून पकोडे बाहेर काढल्यानंतर ते लगेच टिश्यू पेपरवर ठेवण्याची सवय अनेकांना असते. मात्र पकोडे गरम असताना त्यातील वाफ बाहेर पडत असते. अशावेळी ते थेट टिश्यूवर ठेवल्यास त्यातील उरलेले तेल आणि ओलावा पकोड्यांच्या पोतावर परिणाम करू शकतो. त्यामुळे पकोडे मऊ आणि कमी कुरकुरीत होण्याची शक्यता असते.

» आधी जाळीची चाळणी किंवा वायर रॅक वापरा : पकोडे तेलातून काढल्यानंतर त्यांना १५ ते २० सेकंद जाळीच्या चाळणीवर किंवा वायर रॅकवर ठेवावे. त्यामुळे अतिरिक्त तेल खाली निघून जाते आणि पकोड्यांमधील वाफही बाहेर पडण्यास मदत होते. त्यानंतर आवश्यक असल्यास ते टिश्यू पेपरवर ठेवता येतात.

» पिठाचे मिश्रण योग्य प्रमाणात असणे आवश्यक : पकोड्यांसाठी तयार केलेले पीठ ना खूप पातळ असावे ना अतिशय घट्ट. पीठ खूप पातळ असल्यास पकोडे अधिक तेल शोषू शकतात. पकोडे अधिक कुरकुरीत करण्यासाठी पिठात एक-दोन चमचे गरम तेल किंवा थोडे तांदळाचे पीठ मिसळता येते. यामुळे पकोड्यांचा बाहेरील थर अधिक कुरकुरीत होण्यास मदत होते.

» गरम पकोडे लगेच झाकून ठेवू नका : तळलेले पकोडे लगेच झाकून ठेवणे ही आणखी एक सामान्य चूक आहे. गरम पकोडे झाकल्यामुळे त्यातून निघणारी वाफ भांड्यातच अडकते. ही वाफ पाण्याच्या थेंबांमध्ये रूपांतरित होऊन पकोड्यांवर बसते. त्यामुळे पकोड्यांचा कुरकुरीत थर मऊ पडतो आणि ते ओलसर व तेलकट वाटू लागतात. म्हणून तळलेले पकोडे काही काळ मोकळे ठेवणे अधिक योग्य आहे.

### कुरकुरीत पकोड्यांसाठी लक्षात ठेवा...

- ☑ तेल साधारण १७० ते १८० अंश सेल्सिअसपर्यंत गरम असावे.
- ☑ कढईत एकाच वेळी खूप पकोडे सोडू नयेत.
- ☑ तळलेले पकोडे लगेच टिश्यूवर ठेवण्याऐवजी आधी जाळीच्या चाळणीवर किंवा वायर रॅकवर ठेवावेत.
- ☑ पिठात थोडे तांदळाचे पीठ किंवा गरम तेल घालता येते.
- ☑ गरम पकोडे लगेच झाकून ठेवू नयेत.

# मुलगी मोठी होत असेल, तर तिला या 5 गोष्टी नक्की शिकवा...



**मुलं मोठी होऊ लागली की त्यांचं जग केवळ आई-वडिलांपुरतं मर्यादित राहत नाही. ते बाहेरील व्यक्तींशी संवाद साधतात आणि विविध अनुभवांमधून जातात. अशा वेळी विशेषतः मुलींना योग्य- अयोग्य यातील फरक समजणे आणि कोणीही त्यांना सहज आपल्या प्रभावाखाली आणू नये, यासाठी काही महत्त्वाच्या गोष्टी शिकवणे आवश्यक आहे. १४ ते १८ वर्षे वयोगटातील मुलींना काही मूलभूत गोष्टी समजावून सांगणे गरजेचे आहे. त्यामुळे त्या भावनिक दबाव, फसवणूक किंवा चुकीच्या प्रभावापासून स्वतःचे संरक्षण करू शकतील.**

## प्रत्येक काळजी घेणारी व्यक्ती विश्वास ठेवण्यास पात्र असेलच असे नाही...

एखादी व्यक्ती आपली खूप काळजी घेत आहे, आपल्याशी सतत प्रेमाने बोलत आहे किंवा आपल्याला विशेष महत्त्व देत आहे, म्हणून ती व्यक्ती नेहमीच विश्वास ठेवण्यास योग्य असेल असे नाही. अनेकदा अतिप्रमाणात काळजी घेणे, सतत लक्ष देणे किंवा आपल्याशी विशेष जवळीक साधण्याचा प्रयत्न करणे हे चुकीच्या हेतूचे संकेतही असू शकतात. त्यामुळे केवळ एखाद्याच्या गोड बोलण्यावर विश्वास न ठेवता त्याच्या वर्तनाकडेही लक्ष देण्याची सवय मुलींना लावावी.

» कोणी मोठी-मोठी स्वप्ने दाखवत असेल तर विचार करा : एखादी व्यक्ती तुम्हाला मोठी आश्वासने देत असेल किंवा तुमच्या भविष्यासंदर्भात आकर्षक स्वप्ने दाखवत असेल, तर त्यावर लगेच विश्वास ठेवू नका. अशा वेळी स्वतःला प्रश्न विचारा, हे खरोखर माझ्यासाठी योग्य आहे का? या निर्णयाचा मला भविष्यात फायदा होईल का? समोरची व्यक्ती माझ्या हिताचा विचार करते आहे का? भावनेच्या भरात कोणताही मोठा निर्णय न घेता त्याबाबत विश्वासू पालक किंवा व्यक्तीशी चर्चा करण्याची सवय लावणे महत्त्वाचे आहे.

» कोणी तुम्हाला बदलण्याचा प्रयत्न करत असेल तर सावध व्हा : मुलींना हे समजावून सांगणे आवश्यक आहे की, त्यांना त्या जशा आहेत तशा स्वीकारण्याऐवजी एखादी व्यक्ती वारंवार त्यांच्यात बदल करण्याचा प्रयत्न करत असेल, तर ते योग्य वर्तन नाही. कपडे, मित्रमैत्रिणी, आवडी-निवडी, बोलण्याची पद्धत किंवा जीवनशैली याबाबत सतत दबाव आणणे म्हणजे त्या व्यक्तीवर स्वतःच्या इच्छेनुसार प्रभाव टाकण्याचा प्रयत्न असू शकतो. नात्यात परस्पर आदर आणि स्वीकार महत्त्वाचा असतो. त्यामुळे स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाचा आणि निर्णयक्षमतेचा आदर करायला मुलींना शिकवावे.

» स्वतःच्या मनातील शंका दुर्लक्षित करू नका : एखाद्या व्यक्तीच्या वागण्यामुळे अस्वस्थ वाटत असेल, काहीतरी चुकीचे घडत असल्याची जाणीव होत असेल किंवा एखाद्या गोष्टीसाठी दबाव आणला जात असेल, तर ती भावना दुर्लक्षित करू नका. अशा प्रसंगी त्वरित विश्वासू पालक, शिक्षक किंवा अन्य जबाबदार व्यक्तीशी बोलावे. कोणत्याही परिस्थितीत भीतीपोटी किंवा लाजेपोटी गोष्ट मनात ठेवू नये, हे मुलींना समजावून सांगणे गरजेचे आहे.

» आत्मसन्मानाशी कधीही तडजोड करू नका : समोरची व्यक्ती कितीही खास किंवा जवळची असली, तरी स्वतःच्या आत्मसन्मानाशी तडजोड करू नये, हा सर्वांत महत्त्वाचा धडा आहे. भावनेच्या भरात घेतलेले निर्णय अनेकदा चुकीचे ठरू शकतात. त्यामुळे एखाद्या मोठ्या निर्णयाबाबत पूर्ण खात्री आणि समाधान होईपर्यंत घाई करू नये. मुलींना स्वतःच्या मताला, भावनांना आणि निर्णयांना महत्त्व देण्यास शिकवा. त्याचबरोबर पालकांशी कोणतीही गोष्ट मोकळेपणाने बोलता येते, असा विश्वासही त्यांच्या मनात निर्माण करा. यामुळे त्या अडचणीच्या प्रसंगी योग्य मदत मागण्यास संकोच करणार नाहीत.

# सेंधव मिठाच्या पाण्यात पेडिक्युअर? घरच्या घरी पायांना द्या चमक अन् टाचांना बनवा मऊ; जाणून घ्या योग्य पद्धत

**पेडिक्युअर करताना पाय काही वेळ कोमट पाण्यात बुडवून ठेवले जातात. या पाण्यात मीठ, स्फटिक, जेली किंवा इतर काही पदार्थ मिसळले जातात. मात्र, हे पदार्थ नेमके कोणते असतात आणि त्यांचा उपयोग काय, याची माहिती अनेकांना नसते. एप्सम मीठ, सेंधव मीठ, बेकिंग सोडा, गुलाबाच्या पाकळ्या आदी पदार्थांचा वापर करून घरच्या घरी पायांसाठी पेडिक्युअर करता येते. यामुळे पाय स्वच्छ होण्यासोबतच त्वचा मऊ होण्यास, थकवा कमी होण्यास आणि टाचांवरील मृत त्वचा काढण्यास मदत होऊ शकते.**

## पेडिक्युअरमध्ये 'फूट सोक' का महत्त्वाचा?

पेडिक्युअर म्हटले की अनेकांच्या डोळ्यांसमोर स्क्रबिंग येते. मृत त्वचा आणि घट्ट झालेली त्वचा काढण्यासाठी स्क्रबिंग केले जाते. मात्र, त्यापूर्वी पाय काही वेळ पाण्यात भिजवणे हा महत्त्वाचा टप्पा आहे. कोमट पाण्यात योग्य पदार्थ मिसळून पाय भिजवल्यास त्वचा मऊ होण्यास मदत होते. त्यामुळे त्यानंतर स्क्रबिंग करताना टाचांवरील घट्ट त्वचा आणि मृत त्वचा तुलनेने सहज काढता येते.

## पेडिक्युअरसाठी कोणते पदार्थ वापरता येतात?



» एप्सम मीठ : कोमट पाण्यात सुमारे दोन चमचे एप्सम मीठ मिसळून त्यात साधारण २० मिनिटे पाय बुडवून ठेवता येतात. यामुळे पायांचा थकवा कमी होण्यास आणि त्वचा मऊ होण्यास मदत होऊ शकते. पायांना आलेली सौम्य सूज किंवा स्नायूंचा ताण कमी करण्यासाठीही कोमट पाण्यात पाय बुडवणे आरामदायी ठरू शकते. कोणासाठी उपयुक्त? : दीर्घकाळ उभे राहून काम करणाऱ्या व्यक्ती, व्यायाम करणारे किंवा पायांना थकवा जाणवणारे लोक याचा वापर करू शकतात.

» जेली पेडिक्युअर : जेली पेडिक्युअर सध्या सौंदर्यप्रसाधन केंद्रांमध्ये लोकप्रिय आहे. यामध्ये विशिष्ट जेली तयार करणारे पदार्थ पाण्यात मिसळल्यावर पाणी जेलीच्या स्वरूपात बदलते. काही उत्पादनांमध्ये ग्लिसरीन, कोरफड, आवश्यक तेले आणि वनस्पतीजन्य अर्क असू शकतात. यामुळे पाण्याची उब काही काळ टिकून राहते आणि पायांची त्वचा मऊ होण्यास मदत होते. टाचांवरील घट्ट त्वचा मऊ झाल्यामुळे ती नंतर सहज स्वच्छ करता येते. त्वचेला ओलावा मिळण्यासही मदत होऊ शकते. कोणासाठी उपयुक्त? : पायांची त्वचा अतिशय कोरडी असेल किंवा टाचा वारंवार कोरड्या पडत असतील, तर हा पर्याय उपयोगी ठरू शकतो.

» सेंधव मीठ : सेंधव मिठाच्या पाण्यात पाय भिजवण्याची पद्धत अनेक वर्षांपासून प्रचलित आहे. कोमट पाण्यात सेंधव मीठ मिसळून पाय भिजवल्यास त्वचा मऊ होण्यास आणि पाय स्वच्छ करण्यास मदत होऊ शकते. पायांच्या थकव्यापासून आराम मिळण्यास मदत होते. स्नायूंचा ताण आणि कडकपणा कमी होण्यास मदत होऊ शकते. पायांची घट्ट त्वचा मऊ होते. मृत त्वचा काढणे सोपे जाते. पायांची स्वच्छता राखण्यास मदत होते. कोमट पाण्यामुळे आरामदायी अनुभव मिळतो. कोणासाठी उपयुक्त? : ज्यांच्या टाचा खूप कठीण झाल्या आहेत किंवा पायांवर मृत त्वचेचा थर दिसतो, त्यांच्यासाठी सेंधव मिठाच्या कोमट पाण्यात पाय भिजवणे उपयोगी ठरू शकते. तसेच दिवसभर उभे राहून काम केल्यामुळे पायांना थकवा जाणवत असेल, तरी हा उपाय आरामदायी ठरू शकतो.

» गुलाबाच्या पाकळ्या : पेडिक्युअरच्या पाण्यात ताज्या गुलाबाच्या पाकळ्या घातल्यास पायांना सुगंध आणि ताजेपणाचा अनुभव मिळतो. गुलाबाच्या पाकळ्यांमुळे त्वचेला थंडावा आणि मऊपणा जाणवू शकतो. यामुळे : पायांना सौम्य सुगंध मिळतो. ताजेतवाने वाटते. त्वचेला मऊपणा जाणवतो. कोमट पाण्यासोबत आरामदायी अनुभव मिळतो. कोणासाठी उपयुक्त? : ताणतणाव जाणवत असेल किंवा दिवसभराच्या थकव्यानंतर आराम हवा असेल, तर गुलाबाच्या पाकळ्या घातलेल्या कोमट पाण्यात पाय भिजवणे सुखद ठरू शकते.

» बेकिंग सोडा आणि व्हिनेगर : पावसाळ्यात पायांना घाम येणे आणि दुर्गंधी निर्माण होणे याचा त्रास अनेकांना होतो. अशा वेळी पाय स्वच्छ आणि कोरडे ठेवणे महत्त्वाचे आहे. बेकिंग सोडा आणि व्हिनेगर यांचा वापर करण्यापूर्वी त्वचेची संवेदनशीलता लक्षात घेणे आवश्यक आहे. चुकीच्या प्रमाणात किंवा वारंवार वापरल्यास त्वचेला जळजळ किंवा कोरडेपणा जाणवू शकतो. पायांची स्वच्छता राखणे आणि दुर्गंधी कमी करण्यासाठी योग्य स्वच्छता अधिक महत्त्वाची आहे. आवश्यक असल्यास त्वचारोगतज्ज्ञांचा सल्ला घ्यावा. कोणासाठी उपयुक्त? : दीर्घकाळ बंद पादत्राणे वापरणाऱ्या किंवा पायांना जास्त घाम येणाऱ्या व्यक्तींनी पाय स्वच्छ आणि कोरडे ठेवण्यावर विशेष लक्ष द्यावे.

# आईच्या जुन्या साडीला द्या नवा साज; को-ऑर्ड सेटपासून लहंग्यापर्यंत तयार करा आकर्षक पोशाख

**रक्षाबंधनाला आता काहीच दिवस उरले आहेत. अशा वेळी काय परिधान करायचे, याचा विचार करत असाल तर एकदा आईच्या कपाटातील एखादी जुनी साडी नक्की पाहा. या साडीला नव्या पद्धतीने शिवून घेतल्यास त्यापासून आकर्षक आणि आधुनिक पोशाख तयार करता येईल. आईची जुनी साडी केवळ आठवणी म्हणून कपाटात जपून ठेवण्याऐवजी तिचा आपल्या पोशाखात नव्याने वापर करता येतो. विशेषतः अशी साडी जी आता नेसण्याची इच्छा नसते, पण तिच्याशी भावनिक नाते जोडलेले असते, तिच्यापासून विविध प्रकारचे पोशाख तयार करता येतात. साडीच्या कापडाचा वापर करून कुर्ता, स्कर्ट, शरारा, अनारकली, को-ऑर्ड सेट किंवा लहंगा असे अनेक पर्याय तयार करता येतात. यामुळे जुन्या साडीला नवा रूप मिळते आणि त्याच वेळी सध्याच्या फॅशनचा ट्रेंडही साधता येतो. आपल्या आवडीनुसार साडीचा पोशाख तयार करून तो सण, लग्नसमारंभ किंवा पार्टीतही परिधान करता येईल.**





» शरारा संच : आईकडे जुनी ब्रोकेड किंवा रेशमी साडी असेल, तर त्यापासून देखणा आणि पारंपरिक शरारा संच तयार करून घेता येईल. साध्या आणि मोहक रचनेचा शरारा, त्यासोबत जुळणारा कुर्ता आणि दुपट्टा असा पोशाख सणासुदीच्या काळासाठी उत्तम पर्याय ठरू शकतो. रेशमी किंवा ब्रोकेडच्या साडीवरील नक्षीचा योग्य वापर केल्यास पोशाख अधिक आकर्षक दिसतो. रक्षाबंधनासारख्या सणासाठीही हा पोशाख खुलून दिसेल.

» पारंपरिक ढंगाचा को-ऑर्ड संच : जर आईकडे भरजरी किंवा नक्षीकाम केलेली जुनी साडी असेल, तर त्यापासून आधुनिक को-ऑर्ड संच तयार करता येईल. साध्या ब्लाउजसोबत शरारा आणि त्यावर जुळते जाकीट असा पोशाख तयार करता येतो. साडीवरील नक्षीकाम, सितारे किंवा अन्य सजावटीचा योग्य वापर केल्यास पोशाखाला उत्सवी रूप मिळते. साडीच्या तुलनेत असा पोशाख परिधान करणेही तुलनेने सोपे असते.

» अनारकली : जुन्या साडीपासून अनारकली तयार करणे हा देखील उत्तम पर्याय आहे. हा पोशाख परिधान करणे सोपे असते आणि त्याला पारंपरिक, राजेशाही स्वरूपही मिळते. साडी भरजरी असो किंवा हलक्या कापडाची, तिच्या पोत आणि नक्षीनुसार सुंदर अनारकली तयार करता येते. त्यासोबत जुळता दुपट्टा घेतल्यास संपूर्ण पोशाख अधिक उठावदार दिसतो.

» शर्टच्या धाटणीचा को-ऑर्ड संच : जुन्या साडीवर सुंदर प्रिंट असेल किंवा ती सुती असेल, तर तिच्यापासून शर्टच्या धाटणीचा को-ऑर्ड संच तयार करता येईल. बटणे असलेला शर्ट आणि त्यासोबत सैल पँट किंवा पलाझो असा पोशाख तयार करता येतो. हा पोशाख आधुनिक तसेच भारतीय-पाश्चात्त्य शैलीचा मिलाफ साधतो. प्रवास, कार्यालयीन वापर किंवा सहज बाहेर जाण्यासाठीही हा पर्याय उपयुक्त ठरू शकतो.

» ब्रालेट आणि डीप-नेक कुर्ता : प्रिंटेड किंवा उठावदार रंगाची बनारसी साडी असेल, तर तिच्यापासून आधुनिक आणि थर असलेला पोशाख तयार करता येतो. आतमध्ये जुळत्या किंवा विरोधाभासी रंगाचा ब्रालेट-शैलीतील ब्लाउज आणि त्यावर खोल व्ही-नेक असलेला लांब कुर्ता असा पोशाख करता येईल. कुर्त्याच्या गळ्याला लेस किंवा साडीवरील नक्षीचा वापर करून सजावट केल्यास पोशाखाला आकर्षक आणि आधुनिक रूप मिळते. लग्नसमारंभ किंवा अन्य कार्यक्रमांसाठी हा फ्युजन पोशाख चांगला पर्याय ठरू शकतो.

# डोंगरावरुन उडी मारणाऱ्या मुलाला वाचवताना आई-वडिलांचाही मृत्यू

## छत्रपती संभाजीनगर हादरलं, अंगावर काटा आणणारी घटना

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** – छत्रपती संभाजीनगरमध्ये शुक्रवारी एका मुलासह त्याच्या आई-वडिलांचा डोंगरावरुन पडून दुर्देवी मृत्यू झाल्याची घटना घडली. छत्रपती संभाजीनगरच्या तिसगाव भागातील खवड्या डोंगरावर एक १८ वर्षाचा मुलगा आत्महत्या करायला गेला होता. त्यावेळी त्याचे आई-वडील आणि स्थानिक लोक त्याला वाचवण्यासाठी डोंगरावर गेले. आई-वडील आणि इतर लोक त्या मुलाला उडी मारु नकोस, असे समजावत होते. मात्र, मुलगा ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हता. वडील आपल्या मुलाची खूप समजूत काढण्याचा प्रयत्न करत होते. अखेर वडिलांनी पुढे जात मुलाला पकडण्याचा प्रयत्न केला. मात्र, तोपर्यंत मुलाने डोंगरावरुन उडी टाकली होती, त्याला पकडण्याच्या प्रयत्नात वडिलांचाही खाली तोल जाऊन तेदेखील खाली पडले. हे दोघेही डोंगराच्या दरीत खाली पडताच त्यांचा मृत्यू झाला. हा प्रकार पाहून शोक अनावर झालेल्या मुलाच्या आईनेही डोंगरावरुन खाली उडी मारली. त्यामुळे तिचाही



मृत्यू झाला. या घटनेने घटनास्थळी उपस्थित असलेल्या सर्वांनाच धक्का बसला. मुलाने आत्महत्या का केली, याचे कारण अद्याप समजू शकलेले नाही. कुणाल मुरलीधर चांदवडे,मुरलीधर चांदवडे आणि संगीता चांदवडे अशी मृतांची नावे आहेत. हे सर्वजण देवळाई सातारा परिसर येथील असल्याची माहिती समोर आली आहे.

कुणाल चांदवडे हा १८ वर्षांचा मुलगा सकाळी दहा वाजता खवड्या डोंगरावरुन उडी मारुन जीव देण्यासाठी गेला होता. ही गोष्ट त्याच्या आई-वडिलांना समजल्यावर ते तिकडे आले होते. यानंतर जवळच्या गावातील लोक, पोलीस, अग्निशमन दलाचे जवानही घटनास्थळी दाखल झाले. सकाळी १० वाजल्यापासून हे सर्वजण मुलाला उडी मारु नकोस, म्हणून विनवणी करत होते. मात्र, कुणाल चांदवडे हा ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हता. त्याचे वडील त्याला पकडण्यासाठी पुढे सरसावले तेव्हा ते त्याच्यापर्यंत पोहोचले, मात्र, तोपर्यंत कुणालने आपले शरीर खाली झोकून दिले होते. त्यामुळे त्याला वाचवताना मुरलीधर चांदवडे यांचाही तोल गेला आणि दोघेही एकत्रच खाली पडले. या दोघांचा उंचावरुन खाली पडल्यामुळे जागेवरच मृत्यू झाला. हे दृश्य पाहून शोक अनावर झालेल्या आईनेही मागचा पुढचा विचार न करता डोंगरावरुन खाली उडी टाकली.

## दिल्ली पेलेट गन हल्ला प्रकरण!

# अखेर पोलिसांकडून 'एफआयआर' दाखल करण्याची प्रक्रिया सुरु

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – जंतर मंतरवर झालेल्या विद्यार्थी आंदोलनादरम्यान पेलेट गनच्या हल्ल्यात जखमी झालेल्या एका विद्यार्थ्याच्या समर्थनार्थ काँग्रेस नेते आणि खासदार राहुल गांधी यांनी दिल्लीतील पार्लमेंट स्ट्रीट पोलीस ठाण्याबाहेर धरणे आंदोलन सुरु केले आहे. या प्रकरणात एफआयआर दाखल करण्याची मागणी राहुल गांधी यांनी केली आहे. तसेच पोलिसांच्या अपयशाबद्दल नाराजी देखील व्यक्त केली आहे. दरम्यान, गेल्या पाच तासापासून सुरु असलेल्या राहुल गांधी यांच्या धरणे आंदोलनाला यश आलं आहे. दिल्ली पोलिसांनी राहुल गांधी यांची मागणी मान्य केली आहे. अखेर एफआयआर दाखल करण्यास पोलिसांनी तयारी दर्शवली आहे.

दरम्यान, गेल्या पाच ते साडेपाच तााासापासून राहुल गांधी यांनी जखमी





विद्यार्थ्याबरोबर आंदोलन सुरु केले होते. अखेर या आंदोलनाला यश आलं आहे. पोलिसांनी ऋखठ दाखल करण्याची प्रक्रिया सुरु केली आहे. दरम्यान, नरेंद्र मोदी आणि अमित शाह यांच्या राजवटीत शांततेने आंदोलन करणाऱ्या तरुणांवर उघडपणे पेलेट गनने गोळीबार केला जाऊ शकतो, पण त्यांना न्याय मिळू शकत नाही असी टीका राहुल गांधी यांनी केली होती. तसेच जोपर्यंत एफआयआर नोंदवला जात नाही, जोपर्यंत दोषींवर कठोर कारवाईची आम्हाला खात्री मिळत नाही, तोपर्यंत आम्ही आमच्या भूमिकेवर ठाम राहू. आमचे ध्येय न्याय आहे आणि तो आम्ही कोणत्याही परिस्थितीत मिळव असे राहुल गांधी यांनी सांगितले होते. दरम्यान, २० जुलै २०२६ रोजी नवी दिल्लीतील संसदेवर काढण्यात आलेल्या मोर्चादरम्यान विद्यार्थी आंदोलकांवर रॅपिड क्शन फोर्सने पेलेट गनचा वापर करण्यात आला होता.

या हल्ल्यात साहिल लोचव हा तरुण व इतर काही जण गंभीर जखमी झाले होते. पीडित तरुणाच्या शरीरात २०० हून अधिक छर्रे व डोळ्यात ३ छर्रे रुतल्याचा वैद्यकीय अहवालात दावा करण्यात आला आहे. दरम्यान, या प्रकरणावरुन काँग्रेस नेते राहुल गांधी आक्रमक झाले होते. एफआयआर दाखल करण्यासाठी राहुल गांधी यांनी गेल्या पाच तासापासून धरणे आंदोलन सुरु केले होते. अखेर पेलेट गन प्रकरणात एफआयआर दाखल करण्यास दिल्ली पोलीस तयार झाले आहेत. राहुल गांधी गेल्या पाच तासांपासून पार्लमेंट स्ट्रीट पोलीस ठाण्यात एफआयआर दाखल करण्याच्या मागणीवर ठाम होते. दिल्ली पोलिसांनी राहुल गांधींची मागणी मान्य केली आहे. पोलीस अज्ञात व्यक्तींविरुद्ध एफआयआर दाखल करत आहेत.

# गणेशोत्सवात स्वस्तात एसटीने गावी जाता येणार

**मुंबई (प्रतिनिधी)** – गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या हजारो भाविकांना मोठा दिलासा मिळाला आहे. एसटी बसच्या एकेरी गट आरक्षणावर आकारण्यात येणारे ३० टक्के अतिरिक्त शुल्क यंदा रद्द करण्याचा निर्णय महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने घेतला आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सूचनेनंतर हा निर्णय घेण्यात आला असून, त्यामुळे गणेशभक्तांना एसटीने अधिक स्वस्तात गावी जाता येणार आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी शुक्रवारी या निर्णयाची माहिती दिली. गणेशोत्सव आणि एसटी महामंडळाचे कोकणवासीयांशी अनेक वर्षांपासून घट्ट नाते आहे. मुंबई, ठाणे आणि पालघर परिसरातून दरवर्षी हजारो कोकणवासी गणेशोत्सवासाठी एसटीने आपल्या गावी जातात. गणेशोत्सवाच्या काळात दरवर्षी सुमारे पाच हजार एसटी बसचे आरक्षण केले जाते.

प्रवाशांना त्यांच्या गावी सोडल्यानंतर या बस रिकाम्या परत आणाव्या लागतात. त्यामुळे महामंडळाला इंधनासह चालक आणि वाहकांच्या अतिरिक्त कामाचा खर्च सहन करावा लागतो. डिझेलच्या वाढलेल्या किमती तसेच कर्मचाऱ्यांच्या अतिकालीन भत्त्यात झालेली वाढ यामुळे महामंडळाचा खर्च वाढला आहे. याच पार्श्वभूमीवर एकेरी गट आरक्षणावर ३० टक्के अतिरिक्त शुल्क आकारण्याचा निर्णय घेण्यात आला होता. वाढती प्रवाशांची गर्दी लक्षात घेता, अतिरिक्त शुल्क रद्द करण्याच्या निर्णयामुळे गणेशभक्तांना आर्थिक दिलासा मिळणार असून एसटीच्या गट आरक्षणाला यंदा अधिक प्रतिसाद मिळण्याची शक्यता आहे.

## रविवार दिनांक २३ ऑगस्ट रोजी मध्य रेल्वेवर मेगा ब्लॉक

**मुंबई (प्रतिनिधी)** – मध्य रेल्वेच्या मुंबई विभागाकडून विविध अभियांत्रिकी आणि देखभालीची कामे करण्यासाठी येत्या रविवारी, दिनांक २३ ऑगस्ट २०२६ रोजी उपनगरीय मार्गांवर मेगा ब्लॉक जाहीर करण्यात आला आहे. रुळांची दुरुस्ती आणि पायाभूत सुविधांच्या सुरक्षेसाठी हा ब्लॉक घेण्यात येत असून, यामुळे मुख्य मार्ग (मेन लाईन) आणि हार्बर लाईनवरील लोकल सेवांवर परिणाम होणार आहे.

# बंद खोलीतील जातिवाचक शिवीगाळीला ॲट्रोसिटी कायदा लागत नाही; सुप्रीम कोर्ट

**मुंबई (प्रतिनिधी)** – बंदिस्त जागेत, सर्वसामान्य लोकांच्या उपस्थितीशिवाय किंवा त्यांच्या नजरेसमोर न घडलेल्या जातिवाचक शिवीगाळीला अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्याच्या कलम ३(१) (आर) आणि ३(१) (५) अंतर्गत गुन्हा ठरवता येणार नाही, असा महत्त्वपूर्ण निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. या कलमांसाठी कथित अपमान किंवा जातिवाचक शिवीगाळ 'सार्वजनिक दृष्टीक्षेपात' झालेली असणे आवश्यक आहे, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती संदीप मेहता यांच्या खंडपीठाने २० ऑगस्ट २०२६ रोजी 'रामकृष्ण चौहान विरुद्ध उत्तर प्रदेश राज्य व अन्य' या प्रकरणात हा निर्णय दिला. शाळेच्या व्यवस्थापकाविरुद्ध SC/ST कायद्यांतर्गत सुरू असलेली कार्यवाही रद्द करताना न्यायालयाने हा निर्णय दिला.

या प्रकरणातील तक्रारदाराचे दोन मुलगे संबंधित शाळेत शिकत होते. विद्यार्थ्यांमध्ये झालेल्या भांडणानंतर तक्रारदार शाळेचे व्यवस्थापक रामकृष्ण चौहान यांच्याकडे गेला. त्यावेळी चौहान व इतर कर्मचाऱ्यांनी आपल्याशी मारहाण करून जातिवाचक शिवीगाळ केल्याचा आरोप तक्रारदाराने केला.

२५ जानेवारी २०२० रोजी चौहान आणि इतरांविरुद्ध भारतीय दंड संहितेच्या कलम १४७, ३२३, ३४२ आणि ५०४ तसेच SC/ST कायद्याच्या कलम ३(१) (आर) आणि ३ (१) (५) अंतर्गत FIR दाखल करण्यात आली. तपासानंतर आरोपपत्र दाखल झाले आणि ऑगस्ट २०२२ मध्ये विशेष न्यायालयाने त्याची दखल घेतली.

दरम्यान, चौहान यांच्या पत्नीनेही त्याच दिवशी तक्रारदाराविरुद्ध प्रतितक्रार दाखल केली होती. शाळेच्या कार्यालयात तक्रारदाराने आपल्याशी शिवीगाळ व मारहाण केल्याचा आरोप त्यांनी केला होता. विशेष न्यायालयाच्या समन्स आदेशाला चौहान यांनी अलाहाबाद उच्च न्यायालयात आव्हान दिले. मात्र, केवळ ही तक्रार प्रतितक्रार म्हणून दाखल झाली आहे, एवढ्या कारणावरून कार्यवाही रद्द करता येणार नाही, असे सांगत उच्च न्यायालयाने त्यांची याचिका फेटाळली. उपलब्ध सामग्रीवरून प्रथमदर्शनी गुन्हा दिसून येत असल्याचे उच्च न्यायालयाने नमूद केले. यानंतर चौहान यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली.

## पोलीस ठाण्यांची 'अ', 'ब', 'क' वर्गवारी करणार

**मुंबई (प्रतिनिधी)** – वाढती लोकसंख्या, झपाट्याने होणारे शहरीकरण आणि औद्योगिकीकरणामुळे पोलिसांवरील वाढता ताण लक्षात घेऊन राज्य सरकारने नव्याने स्थापन होणाऱ्या पोलीस ठाण्यांसाठी मनुष्यबळाचे सुधारित प्रमाणक निश्चित केले आहेत. गुन्ह्यांचे प्रमाण, लोकसंख्या, औद्योगिक क्षेत्र, पर्यटन, धार्मिक स्थळे, संवेदनशील भाग आणि बंदोबस्ताची गरज अशा विविध निकषांच्या आधारे पोलीस ठाण्यांची 'अ', 'ब' आणि 'क' अशी वर्गवारी करण्यात येणार आहे. गृह विभागाने याबाबत शासन निर्णय जारी केला आहे. विशेष म्हणजे मुंबई पोलीस आयुक्तालयाला या वर्गवारीतून वगळण्यात आले असून, मुंबईतील विद्यमान पोलीस ठाणी 'अ' वर्गाची मानण्यात आली आहेत.


## Change In Name

My old name is: **NASEEM BEGUM** which now I am changing as new Name: **NASEEM FIRDOSE** hence forth my all correspondence will be done as per my new name please consider the same.

Sign By: NASEEM FIRDOSE

H. No. 9-6- 1075/1, Rahmat Nagar, Near Moti Masjid, Gadegao Road Behind Tajvidul Quran, Nanded- PIN: 431604. Maharashtra Ph: 9975501766

## टी.सी. हरवली

माझी पंकज चंद्रकांत सोनावळे या नावाची टी.सी. क्र. टीसी / २०१५ / १५०१, एस जी जी एस आय ई टी, नांदेड येथून प्राप्त झालेली असून ती दिनांक ०२/०३/२०२६ रोजी टाकळी ढोकेश्वर, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर परिसरात गहाळ झाली आहे. कोणाला टी.सी. सापडल्यास कृपया खालील पत्त्यावर किंवा मोबाईल न.संपर्क साधावा.

संपर्कपत्ता – पंकज चंद्रकांत सोनावळे मु.पो. टाकळी ढोकेश्वर, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर ४१४३०४ मोबाईल: ८८५०६८०९७६

## Change In Name

My old name is **SHAFIUDDIN MOHAMMAD ISMAIL** which is now i am changing as new name **SHAFIUDDIN MOHD ISMAIL.** Hence forth my all correspondence will be done as per my new name please Consider the same.

**Address:- H.No. 1-7-25, Work Shop Opp. Best Xerox, Sahyog Nagar, Tarods Bk. Nanded 431605 Mo.No. 9028978978**

## टी.सी. हरवली

माझी संगिता माणिकराव गोवंदे या नावाची दहावी पासची टी.सी. नांदेड ते मुंबई रेल्वे प्रवास करत असताना हरवली आहे. कुणास सापडल्यास खालील पत्त्यावर आणून द्यावी योग्य ते बक्षीस दिले जाईल.– **संपर्क पत्ता – संगिता माणिकराव गोवंदे, रा. राजेश नगर, तरोडा (खु.), कॅनॉल रोड, नांदेड मो.नं. ९६८९४११७७०**

## VEHICL FOR SALE

Offer for sale of Vehicle on As is Where is Basis

| Vech No. | Year | Model |
|---|---|---|
| MH-29-CB-3741 | 2024 | NEW HOLAND 3600 TX TRACTOR |

Offer for sale of Vehicle on As is Where is Basis

All offer may of exclusive of TAX where applicable. The purchaser shall have to take all necessary steps for transferring the vehicle in his name with the RTO. Offer should reach us on or before 28/08/2026 Offer reach after the sold date the company reserve the right to reject any or all the offer without assigning any reason what so ever. The company does not undertake any responsibility for non-receipt/loss/delay of offer documents during transit. The offer should be sent to the following address.

SUNDARAM FINANCE LIMITED

IInd Floor, Parmar Complex, Bafna T-Point, Nanded 431601

9860810421, 8657758854

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, माझे पक्षकार **श्वेता पांडुरंगराव जोगदंड** वय ३८ वर्षे, धंदा-शिक्षण रा.बजाज सिटी,छत्रपती चौक जवळ,नांदेड ता.जि.नांदेड यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरुन जाहीर प्रगटन देण्यात येते की, माझे पक्षकार यांनी **लक्ष्मण एकनाथ बुक्तरे (नाथा)** वय ५२ वर्ष धंदा-मजुरी रा.वाडी (बु.) नांदेड ता.जि.नांदेड यांच्या मालकी व ताब्यातील मौजे चेअरमन पाटी,वाडी ( बु.) ता.जि. जि.नांदेड येथील शेत गट क्र. १४१/३ मधील २ गुंठे जमिन म्हणजे ज्याची लांबी पुर्व-पश्चिम ३३ फुट व रुंदी दक्षिण-उत्तर ६६ फुट आहे. ज्याचे एकुण क्षेत्रफळ २१७८ चौ.फुट असून ज्याची चतुं:सिमा पुढील प्रमाणे आहे.

**पुर्वेस :- १२ फट रोड आहे. पश्चिमेस :- लिहून देणार यांची उर्वरित जागा आहे.**
**दक्षिणेस:- लिहून देणार यांची उर्वरित जागा आहे. उत्तरेस :- ३३ फुट रूंद रोड आहे.**

वरील चतुं:सिमेच्या आतील प्लॉट माझ्या पक्षकाराने **लक्ष्मण एकनाथ बुक्तरे (नाथा)** वय ५२ वर्ष धंदा-मजुरी रा.वाडी (बु.) नांदेड ता.जि.नांदेड यांच्याकडुन कायमस्वरुपी खरेदी करण्याचा दिनांक २१/०१/२०२२ रोजी रुपये ५००/- रु.बॉन्ड पेपरवर करारनामा केला आहे. व सदर प्लॉट **श्वेता पांडूरंगराव जोगदंड** वय ३८ वर्षे, धंदा-शिक्षण रा.बजाज सिटी,छत्रपती चौक जवळ,नांदेड ता.जि.नांदेड यांनी विक्रीखता आधारे करारनामा केला आहे. माझ्या पक्षकाराने विक्रीखताची संपूर्ण रक्कम **लक्ष्मण एकनाथ बुक्तरे (नाथा)** यांना दिलेली आहे.

सदर मिळकती बाबत कोणाचे काही हितसंबंध वारसहक्क भाऊ बंदकी, वाद न्यायप्रविष्ठ प्रकरण भुसंपादन अथवा शासकीय अथवा निमशासकीय बोजा, कर्ज,गहाण, तारण इत्यादी कोणत्याही स्वरुपाचे उजर अथवा आक्षेप असल्यास सदर प्रकटण प्रसिध्दी दिनांकापासुन ०७ दिवसा पर्यंत आपल्या मुळ कागदपत्रसहीत पुढील कार्यालयात लेखी आक्षेप नोंदवावे. दिलेल्या मुदतीत कोणाचे आक्षेप उजर नाही आल्यास सदर मिळकत निर्विवादीत गृहीत धरुन माझे पक्षकार दुय्यम निबंधक कार्यालय येथे नोंदणीखत,खरेदीखत करुन घेतील मुदतीनंतर आलेले आक्षेप माझ्या पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही.

'करीता हे जाहीर प्रगटन लिहून देत आहे.

**मार्फत:**

**ॲड.खर्गखरार्टे एम.सी.**
**नांदेड जिल्हा सत्र न्यायालय**
**मो.नं. 8766461209**

**पक्षकार**
**श्वेता पांडूरंगराव जोगदंड**
रा.बजाज सिटी,छत्रपती चौक जवळ,नांदेड

## टी.सी. हरवली

माझी बालाजी प्रल्हाद कदम या नावाची बारावी पासची टी.सी. नांदेड ते पुणे रेल्वे प्रवास करत असताना हरवली आहे. कुणास सापडल्यास खालील पत्त्यावर आणून द्यावी योग्य ते बक्षीस दिले जाईल.– **संपर्क पत्ता – बालाजी प्रल्हाद कदम, रा. सरसम (बु.) ता. हिमायतनगर जि. नांदेड मो. नं.८४२१४५०२६८**

## टी.सी. हरवली

माझी यश आनंदा कचरे या नावाची बारावी (वाणिज्य) पासची टी.सी. सिडको ते छत्रपती चौक प्रवास करत असताना हरवली आहे. कुणास सापडल्यास खालील पत्त्यावर आणून द्यावी योग्य ते बक्षीस दिले जाईल.– **संपर्क पत्ता – यश आनंदा कचरे, रा. संभाजी चौक, सिडको, नांदेड मो.नं. ७७४१०१३४५७**

## जाहीर प्रगटन

(जन्म नोंद आदेशासाठी)

याद्वारे प्रगटन देण्यात येते की, अर्जदार तुकाराम रावसाहेब भवर वय ४५ रा. कांकांडी ता. जि. नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचे मुलाचे जन्म प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होणेकरीता मागणी केली आहे.

जन्म झालेल्याचे नाव नितीन तुकाराम भवर रा. कांकांडी ता. जि. नांदेड या सदर व्यक्तीचा राहते घर कांकाडी ता. जि. नांदेड ठिकाणी दिनांक १६.०९.२००७ या दिवशी जन्म झाला असून जन्म प्रमाणपत्र मिळणेकरीता आदेश होणेसाठी सदर कार्यालयात दिनांक १६.०४.२०२६ रोजी तहसिल कार्यालय नांदेड येथे अर्ज पुराव्यासह सादर केला आहे.

वरील जन्म दिनांकाबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या तहसिल कार्यालय नांदेड येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक २२.०५.२०२६
स्थळ –नांदेड

**तहसिलदार नांदेड तथा**
**तालुका दंडाधिकारी नांदेड**

## जाहीर प्रगटन

**कंधार येथील न्यायदंडाधिकारी प्र.वर्ग न्यायालय कंधार यांचे न्यायालयात**
**फौजदारी किरकोळ अर्ज क्र.(M.C.A) ०९/२०२५**
इरफाना बेगम **विरुदध** महमद शफिखॉन

**अर्जदार:–** इरफाना बेगम भ्र. महमद शफिखॉन पठाण वय ३२ वर्षे, व्यवसाय घरकाम रा आसाननगर कंधार, हा.मु. विजयगड प्रियदर्शनीनगर कंधार ता.कंधार जि. नांदेड

**गैरअर्जदार:–** महमद शफिखॉन पठाण पि. महमद अतिकखान पठाण, वय ३६ धंदा क्लीनर – ट्रॅव्हल्स रा आसाननगर कंधार ता कंधार जि नांदेड

**प्रकरण:–** जुने कलम १२५(३) सि.आर.पी.सी नविन १४७ बि.एन.एस.एस. २०२३ नुसार अर्ज.

दावा कलम १२५(३) सि.आ.पी.सी कायदयाप्रमाणे ..... ज्याअर्थी अर्जदाराने या न्यायालयात असा अर्ज केला आहे की, गैरअर्जदार महमद शफिखॉन पठाण पि. महमद अतिकखान पठाण, वय ३६ धंदा क्लीनर – (ट्रॅव्हल्स) रा आसाननगर कंधार ता कंधार जि नांदेड यांना उपरोक्त प्रकरणात हजर होण्याकरीता कोर्टमार्फत वारंवार समन्स पाठविले असता ते समन्स घेण्यास टाळाटाळ करीत आहेत व समन्स घेण्याचे जाणीवपुर्वक टाळा टाळ करीत आहेत.

या जाहीर प्रगटनाद्वारे आपणास कळविण्यात येते की, आपण हे जाहिर प्रगटन वर्तमान पत्रात प्रसिध्द झालेपासुन ३० दिवसाचं आत या न्यायालयात स्वत: अथवा आपल्या वकीला मार्फत सकाळी ११:०० वाजता हजर रहावे. अन्यथा आपल्या विरूध्द एकतर्फी आदेश करण्यात येवुन प्रकरण निकाली काढण्यात येईल.

आज दिनांक १९/०८/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

क.लिपीक
न्यायदंडाधिकारी प्र.वर्ग, न्यायालय कंधार

सहाय्यक अधिक्षक
न्यायदंडाधिकरी प्र.वर्ग न्यायालय कंधार

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस व संबंधीतास या जाहीर प्रगटनाव्दारे सुचित करण्यात येते की, भीमाशंकर सहकारी गृह निर्माण संस्था म. गोपाळचावडी ता.जि. नांदेड या संस्थेचा गोपाळचावडी येथील गट नंबर ३५ पैकी एक प्लॉट क्र. २०३ श्री आत्माराम नागोजी येजगे यांच्या मालकीचा असून सदरील प्लॉटची साईज लांबी १०.७ बाय १५ मिटर व रुंदी १०.७ मिटर असून एकूण क्षेत्रफळ १५१.०५ चौ.मी. आहे. ज्याची चर्तुः सिमा पुढील प्रमाणे आहे.

पूर्वेस – प्लॉट क्र. २२५.
पश्चिमेस – संस्था अंतर्गत ६ मीटरचा रोड.
दक्षिणेस – प्लॉट क्र. २०४.
उत्तरेस – प्लॉट क्र. २०२.

वरील वर्णनाचा प्लॉटधारकाचे दि. ०३.०३.२००९ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात वाटणी पत्रकाप्रमाणे व त्यांच्या इतर वारसाने संमती दिल्यामुळे सदरील प्लॉट क्र.२०३ व त्यांच्या नावावरील जमा सभासद शेअर्स श्री श्रीनिवास चिंतामणी येजगे रा. शेवडी बाजीराव ता. लोहा जि. नांदेड यांच्या नावावर ट्रान्सफर करण्यासाठी व श्री आत्माराम नागोजी येजगे यांचे सभासदत्व रद्द करण्याबाबत संस्थेत प्रस्ताव सादर केला आहे.

तरी वरील वर्णनाचा प्लॉट हस्तांतरण करण्याबाबत वारस, नातलग, किंवा इतर कोणाचाही उजर, दावा, आक्षेप, हक्क किंवा सहकारी, सरकारी, निमसरकारी कर्ज बोजा असेल त्यांनी आपला उजर, आक्षेप हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्यासह या संस्थेच्या कार्यालयात दाखल करावा. त्यानंतर आलेल्या आक्षेपाचा विचार केला जाणार नाही. व सदरील प्लॉट क्र. २०३ श्रीनिवास चिंतामणी येजगे यांच्या नावावर हस्तांतर करण्यात येईल.

जाहीर प्रगटन देणार

श्री एकनाथराव मामडे, सचिव
श्री ईश्वरराव भोसीकर (मा.आमदार), चेअरमन

भीमाशंकर सहकारी गृहनिर्माण संस्था म. गोपाळचावडी ता.जि. नांदेड औफीस संपर्क : ९०९६४६६२६४

## Change In Name

OLD NAME IS **SHEIKH RAMJAN HASANSHA.** NOW I AM CHANGING AS A NEW NAME **SHAIKH RAMJAN HASANSHA.** HEANCE FORTH MY ALL CORRESPONDENCE WILL BE DONE AS PER MY NEW NAME. PLEASE KINDLY CONSIDER THE SAME. FULL ADDRESS. H.NO.193, MUSLIM GALLI UMRA AT POST UMRA TQ LOHA DIST NANDED MS 431707. MOB.NO.9637307002.

## Change In Name

My old name is **YASMEEN KHAN** which is now i am changing as new name **KHAN YASMEEN MOHAMMED TAHA ADNAN.** Hence forth my all correspondence will be done as per my new name please Consider the same.

**Address:- R/o 1-7-901, Visa House Peer Nagar, Taroda Bk, Nanded-431605 Dist Nanded (Maharashtra) Mob:- 9849776386**

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८



## Change In Name

My old name is: **ABDUL WASE SANI** which now I am changing as new Name:**ABDUL WASAY SANI** hence forth my all correspondence will be done as per my new name please consider the same.

Sign By : ABDUL WASAY SANI

H. No. 9-6- 1075/1, Rahmat Nagar, Gadegao Road, Near Moti Masjid, Nanded- PIN: 431604. Maharashtra Ph: 9975501766

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१, ९८६०७२१३५६



# गोदातीर समाचार



**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




### एलसीबीची शहरात दुहेरी कारवाई

## मोटारसायकलसह ७ मोबाईल जप्त, तर तलवारीसह एकाला अटक

**नांदेड (प्रतिनिधी)** –शहर व जिल्ह्यातील मालमत्तेविरुद्धचे गुन्हे तसेच अवैध शस्त्र बाळगणाऱ्या व्यक्तीविरुद्ध प्रभावी कारवाई करण्याच्या पोलीस अधीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने मोटारसायकल व मोबाईल चोरीचे गुन्हे उघडकीस आणून १ लाख २४ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला, तर विमानतळ पोलीस ठाणे हद्दीत विनापरवाना धारदार शस्त्रे बाळगणाऱ्या आरोपीस अटक करून दोन तलवारी व एक खंजर असा ४ हजार ५०० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.



**मोटारसायकल व मोबाईल चोरीचे गुन्हे उघड; १.२४ लाखांचा मुद्देमाल जप्त**

दिनांक १९ ऑगस्ट रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे सपोनि रवी वाहुळे व त्यांच्या पथकास गोपनीय बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, अर्धापूर पोलीस ठाणे हद्दीत मोटारसायकल चोरी करणारा आरोपी शेख फुरखान उर्फ कालू शेख नयूम, वय २१ वर्षे, रा. नांदेड हा श्रावस्तीनगर परिसरात आहे.

मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी आरोपीस ताब्यात घेतले. त्याच्याकडे विनानंबरची पल्सर मोटारसायकल आढळून आली. चौकशी केली असता सदर मोटारसायकल त्याने सुमारे दीड ते दोन महिन्यांपूर्वी मदिनानगर, अर्धापूर येथून चोरी केल्याचे सांगितले. अभिलेखाची पडताळणी केली असता सदर मोटारसायकल चोरीबाबत अर्धापूर पोलीस ठाणे गु.र.नं. ३७४/२०२६, कलम ३०३(२) BNS अन्वये गुन्हा दाखल असल्याचे निष्पन्न झाले.

आरोपीची अधिक चौकशी केली असता त्याने विविध ठिकाणांहून मोबाईल फोन चोरी केल्याची माहिती दिली. त्याच्या ताब्यातून एक पल्सर मोटारसायकल व सात मोबाईल फोन, असा एकूण १ लाख २४ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. जप्त मोबाईल फोनबाबत तांत्रिक विश्लेषण करून त्यांचा इतर चोरीच्या गुन्ह्यांशी संबंध तपासण्यात येत असून, आरोपीकडून आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

**विनापरवाना धारदार शस्त्रे बाळगणाऱ्या आरोपीस अटक; २ तलवारी व खंजर जप्त**

दिनांक १९ ऑगस्ट २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक अवैध व्यवसाय व आरोपी शोधकामी नांदेड शहरात पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय माहितीवरून एक युवक विनापरवाना धारदार शस्त्रे घेऊन फिरत असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली.

या माहितीच्या आधारे पंचांसोबत घेऊन नमस्कार चौक परिसरात साई प्रार्थना ग्रेनाईट दुकानासमोर सापळा रचण्यात आला. सुमारे रात्री ९ वाजता संशयित इसम आढळून आल्यानंतर त्यास ताब्यात घेऊन नाव-पत्ता विचारला असता त्याने आपले नाव सुनील बबनसिंग ठाकूर, वय ३२ वर्षे, व्यवसाय चालक, रा. गजानन सोसायटी, नमस्कार चौक, नांदेड असे सांगितले.

पंचांसमक्ष त्याची झडती घेतली असता त्याच्या ताब्यातून २ लोखंडी तलवारी, प्रत्येकी अंदाजे २ हजार रुपये किंमतीच्या व १ लोखंडी खंजर, अंदाजे ५०० रुपये किंमतीचा असा एकूण ४ हजार ५०० रुपये किंमतीची तीन धारदार शस्त्रे मिळून आली. सदर शस्त्रे बाळगण्याबाबत आरोपीकडे कोणताही वैध परवाना नसल्याचे निष्पन्न झाल्याने शस्त्रे पंचनामा करून जप्त करण्यात आली.

याप्रकरणी पोलीस अंमलदार देविदास चव्हाण यांच्या फिर्यादीवरून विमानतळ पोलीस ठाणे, नांदेड येथे गु.र.नं. ३८९/२०२६, कलम ४/२५ भारतीय हत्यार कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीस अटक करण्यात आली आहे.

## आमराबाद तांडा खून प्रकरणाचा निकाल; मुख्य आरोपीला ७ वर्षे कारावास

### तीन जणांना एक वर्षाची शिक्षा

**नांदेड (प्रतिनिधी)** –अर्धापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील आमराबाद तांडा येथे दिनांक २८ फेब्रुवारी २०२२ रोजी घडलेल्या श्रीनिवास पवार हत्या प्रकरणात जिल्हा न्यायालयातील अतिरिक्त सत्र न्यायाधीश तुषार आगलावे (पहिले) यांनी महत्त्वपूर्ण निकाल देत आरोपींना शिक्षा सुनावली आहे.

या प्रकरणात मुख्य आरोपीस सात वर्षे सश्रम कारावास व ५० हजार रुपये दंड, तर इतर तीन आरोपींना प्रत्येकी एक वर्ष सश्रम कारावास व प्रत्येकी ५०० रुपये रुपये दंड अशी शिक्षा सुनावण्यात आली आहे.

दिनांक २८ फेब्रुवारी २०२२ रोजी आमराबाद तांडा (ता. अर्धापूर) येथे डुकराच्या शिकारीच्या मटणाच्या पैशांच्या क्षुल्लक वादातून आरोपी रणजीत अंगूर पवार व त्याच्या साथीदारांनी फिर्यादी बालाजी हारलाल पवार यांच्या घरासमोर गैरकायद्याची मंडळी जमवून फिर्यादी यांचा मुलगा श्रीनिवास बालाजी पवार (मयत) यास शिवीगाळ करत काठ्या व लोखंडी रॉडने जबर मारहाण केली होती.

या मारहाणीत श्रीनिवास पवार याच्या डोक्यात गंभीर दुखापत झाल्याने उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला होता. सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या तक्रारीवरून पोलीस ठाणे अर्धापूर येथे गु.र.नं. ५३/२०२२, कलम ३०२, १४३, १४७, १४८, १४९, ३२३, ५०४ भा.दं.वि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या गुन्ह्याचा तपास तत्कालीन पोलीस उपनिरीक्षक कपील आगलावे यांनी केला असून, सदर प्रकरणात घटनास्थळ पंचनामा, जप्ती पंचनामा, FSL तपासणी, प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांचे जबाब, वैद्यकीय अहवाल व इतर आवश्यक सखोल तपास पूर्ण करून मा. न्यायालयात विहित वेळेत दोषारोपपत्र (चार्जशीट) दाखल करण्यात आले होते. सदर खटला सेशन केस क्र. १२३/२०२२ अन्वये मा. अतिरिक्त सत्र न्यायाधीश-१, नांदेड यांच्या न्यायालयात चालविण्यात आला.

पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशाने न्यायालयात चालू असलेल्या खटल्यांमध्ये विशेष लक्ष देण्यासाठी TRIL MONITORING CELL ची स्थापना करण्यात आली आहे.

या खटल्यात सरकारी पक्षातर्फे प्रभावी युक्तिवाद करण्यात आला. तपासादरम्यान संकलित करण्यात आलेले पुरावे व प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांची विश्वासार्ह साक्ष न्यायालयासमोर प्रभावीपणे मांडण्यात आली. त्याची दखल घेत मा. न्यायालयाने आरोपींना कोणतीही सहानुभूती न दाखवता शिक्षा सुनावली आहे.

रणजीत अंगूर पवार यास कलम ३०४ (भाग २) भा.दं.वि. अन्वये दोषी ठरवून ७ वर्षे सश्रम कारावास व ५० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. सदर आरोपी गुन्हा घडल्यापासून कारागृहात आहे. तसेच इतर तीन आरोपी अंगूर बाटू पवार, मीनाबाई अंगूर पवार, वंदनाबाई अंगूर पवार, सर्व रा. आमराबाद तांडा, ता. अर्धापूर, जि. नांदेड यांना प्रत्येकी एक वर्षाची कारावासाची शिक्षा सुनावली.

## कर्जमाफीसाठी फार्मर आयडी अपडेट करून शेतकऱ्यांची केवायसी अडचण दूर करावी –मागणी



**अर्धापूर (प्रतिनिधी)** – शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळण्यासाठी फार्मर आयडी अपडेट नसल्याने केवायसी प्रक्रिया करताना मोठ्या अडचणी निर्माण होत आहेत. फार्मर आयडी अपडेट नसल्यामुळे शेतकऱ्यांना केवायसी करण्यासाठी विलंब होत असून, कर्जमाफीच्या लाभापासून शेतकरी वंचित राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

याकडे संबंधित विभागाने तातडीने लक्ष घालून शेतकऱ्यांचे फार्मर आयडी अपडेट करावेत, तसेच केवायसी प्रक्रिया सुलभ व त्वरित होण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळविण्यासाठी फार्मर आयडी अपडेट करणे अत्यंत आवश्यक असून, वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याची तातडीने दखल घेऊन संबंधित यंत्रणेला आवश्यक सूचना द्याव्यात, अशी मागणी जिल्हाधिकारी नांदेड तसेच तहसीलदार अर्धापूर यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

यावेळी भाजप युवा मोर्चाचे माजी तालुकाध्यक्ष जठन पाटील मुळे, सामाजिक कार्यकर्ते तुळशीराम बंडाळे, शेतकरी विठ्ठल काकडे, भाजयुमोचे आनंद वैद्य, कुश भांगे, शेतकरी संतोष पवार, गणेश सीतापराव व दादाराव देशमुख यांनी निवेदन देऊन शेतकऱ्यांच्या समस्येकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी केली.

## गोविंद संगनवार यांचे निधन

**नांदेड (प्रतिनिधी)** – शहरातील कैलासनगर येथील रहिवासी एस. टी. महामंडळातील सेवानिवृत वाहक गोविंद मारोतीराव संगनवार (वय ८०) यांचे २१ ऑगस्ट रोजी पहाटे ३.३५ वाजता निधन झाले आहे. २१ रोजी सायंकाळी ५ वाजता गोवर्धनघाट नांदेड येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या पश्चात तीन मुले, दोन मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. फॅशन डिझाईन टीचर एकनाथ संगनवार, सामाजिक कार्यकर्ते राजू संगनवार, राम संगनवार यांचे ते वडील होत.

## पुसदहून नांदेडकडे गुटखा तस्करी; सिंदखेड पोलिसांनी कारसह मुद्देमाल केला जप्त, दोघांवर गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)** –जिल्ह्यात अवैध धंद्यांविरुद्ध पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशानुसार सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत सिंदखेड पोलीस ठाण्याच्या पथकाने प्रतिबंधित गुटखा व सुगंधित तंबाखूची अवैध वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध कारवाई करत मोठा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईत एकूण ७ लाख ४० हजार ७०० रुपयांचा प्रतिबंधित गुटखा, सुगंधित तंबाखू व वाहतुकीसाठी वापरण्यात आलेले वाहन जप्त करण्यात आले असून संबंधित आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



गोपनीय माहितीवरून सहायक पोलीस निरीक्षक संतोष जोंधळे यांचे पथक दि. २० ऑगस्ट रोजी आपले पथक अवैध धंद्यांविरुद्ध प्रतिबंधात्मक कारवाईसाठी गस्त घालत असताना सारखणी वन तपासणी नाका रोडवर अवैध गुटख्याची वाहनातून वाहतूक होत असल्याची माहिती मिळाली.

माहितीची खातरजमा करून पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी जाऊन संबंधित वाहन अडवून त्याची तपासणी केली. तपासणीदरम्यान कार क्र. MH-29 CR-0155 ची तपासणी केली असता वाहनात पोत्यामध्ये शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा व सुगंधित तंबाखूचा साठा आढळून आला.

त्यामध्ये विविध कंपन्यांचा प्रतिबंधित गुटखा व सुगंधित तंबाखू किंमत १ लाख ४० हजार ७०० रुपये व एक कार (MH-29 CR-0155) अंदाजे किंमत ६ लाख रुपये असा एकूण ७ लाख ४० हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या कारवाईदरम्यान आरोपी प्रफुल्ल भालचंद्र येन्नावार, वय ३८ वर्षे, रा. लक्ष्मीनगर, पुसद आणि निवृत्ती धर्माजी अल्लडवार, वय ४९ वर्षे, रा. सुभाष वार्ड, पुसद, जि. यवतमाळ यांच्या ताब्यातून वरील मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, आरोपींविरुद्ध सिंदखेड पोलीस ठाण्यात गु.र.नं. ९३/२०२६, कलम १२३, २४७, २७५ BNS सह कलम २६, २७, ३०(२)(अ), ५९ अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## वीरशैव लिंगायत समाजाला राज्य शासनाची 'अमृत' भेट -संजय कौडगे

**नांदेड (प्रतिनिधी)** –राज्य शासनाने शासकीय आदेश काढून राज्यातील बहुसंख्य असणाऱ्या वीरशैव लिंगायत समाजाला महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) या स्वायत संस्थामध्ये हिंदू लिंगायत, वीरशैव लिंगायत या समाजाचा समावेश केला असून, यामुळे समाजातील महिला, नागरिक, युवक युवतींना याचा लाभ मिळणार आहे. यामुळे राज्य शासनाने वीरशैव लिंगायत समाजाला अमृत भेट दिल्याचे मत भाजपा प्रदेश उपाध्यक्ष तथा वीरशैव लिंगायत संघाचे अध्यक्ष संजय कौडगे यांनी व्यक्त केले आहे. या बरोबर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व ना. अतुल सावे यांचे आभार मानले आहेत.

या निर्णयामुळे आर्थिकदृष्ट्या मागास हिंदू लिंगायत व वीरशैव लिंगायत समाजातील युवक-युवतींना उच्च शिक्षण, कौशल्य विकास, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन तसेच स्वयंरोजगाराच्या विविध संधी तसेच समाजातील शेतकरी घटकालाही हा लाभ मिळणार असल्याने खरा लाभार्थी आर्थिक सक्षमीकरणरच्या वाटेवर येणार आहे.

शासनाच्या या निर्णयामुळे जे नागरिक अथवा विद्यार्थी इतर मागासवर्ग (ओबीसी) किंवा अन्य आरक्षित प्रवर्गाचा तसेच स्वतंत्र महामंडळांचा लाभ घेत नाहीत, त्यांना आता 'अमृत' संस्थेच्या विविध कल्याणकारी व शैक्षणिक योजनांचा लाभ घेता येणार आहे. यामुळे समाजातील गुणवंत विद्यार्थी, युवक-युवती तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना शिक्षण व रोजगाराच्या क्षेत्रात पुढे जाण्यासाठी मोठी मदत मिळणार आहे.

> 'अमृत'च्या माध्यमातून समाजातील युवक-युवतींना शिक्षण, कौशल्य विकास, स्पर्धा परीक्षा आणि स्वयंरोजगाराच्या क्षेत्रात नव्या संधी उपलब्ध होतील. हा निर्णय समाजाच्या सर्वांगीण विकासाला चालना देणारा असून, राज्य शासनाने वीरशैव लिंगायत समाजाला दिलेली ही खऱ्या अर्थाने 'अमृत भेट' आहे, असे संजय कौडगे

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली तसेच नामदार अतुल सावे यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य शासनाने वीरशैव लिंगायत समाजाच्या हितासाठी घेतलेल्या या निर्णयाचे संजय कौडगे यांनी स्वागत केले. या निर्णयाबद्दल त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि नामदार अतुल सावे यांचे मनःपूर्वक आभार मानले.

## भागीरथीबाई देशमुख यांचे निधन

**मुदखेड (प्रतिनिधी)** – बारड येथील ज्येष्ठ महिला भागीरथीबाई बालासाहेब देशमुख (वय ७२) यांचे दि. २१ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले आहे.



त्यांच्यामागे पती, दोन मुले, दोन मुली सून, नातवंड असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिव देहावर शनिवार, दि.२२ रोजी स. १० वा. राहत्या गावी अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. कॉंग्रेस कमिटीचे तालुकाध्यक्ष प्रताप देशमुख, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक निलेश देशमुख यांच्या त्या आई होत.

## वीज मंडळाचा पीएफ ट्रस्ट ईपीएफओत विलीनीकरणाला विरोध

### वर्कर्स फेडरेशनकडून नाराजी; १ लाख कर्मचाऱ्यांच्या पेन्शन आणि कर्जावर गदा

**नांदेड (प्रतिनिधी)**– मंडळाचा (एमएसईबी) १९६० पासून कार्यरत असलेला स्वतंत्र भविष्य निर्वाह निधी (पीएफ) ट्रस्ट केंद्रीय ईपीएफओ (ईपीएफओ) मध्ये विलीन करण्याच्या प्रशासकीय हालचालींविरोधात महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशनने तीव्र असंतोष व्यक्त केला आहे. १ लाख कर्मचाऱ्यांच्या हिताशी संबंधित असलेला हा एकतर्फी निर्णय बेकायदेशीर असून, त्याला फेडरेशनचा पूर्ण विरोध असल्याचे सरचिटणीस कॉम्रेड कृष्णा भोयर व अध्यक्ष कॉम्रेड मोहन शर्मा यांनी स्पष्ट केले.

वीज कर्मचाऱ्यांच्या वेतनातून कपात केलेला निधी या ट्रस्टद्वारे गुंतवला जातो, ज्यातून दरवर्षी ८.३० ते ९.०० टक्के असा ईपीएफओपेक्षा अधिक परतावा कर्मचाऱ्यांना मिळाला आहे. जानेवारी २०२६ पासून स्टेट बँक ऑफ इंडिया पोर्टफोलिओ मॅनेजमेंटकडे गुंतवणुकीचे अधिकार दिल्यानंतर त्यांनी १०८ कोटी रुपयांचा परतावा मिळवून दिला आहे. त्यामुळे उद्भवलेली तूट सहज भरून काढणे शक्य असतानाही प्रशासनाकडून विलिनीकरणाचा डाव आखला जात असल्याचा आरोप संघटनेने केला आहे.

ट्रस्टने नुकतेच १८ ऑगस्ट २०२६ रोजी एक परिपत्रक काढून कर्मचाऱ्यांची परतावा सुविधा अचानक बंद केली आहे. या निर्णयामुळे आजारपण, लग्नकार्य, शिक्षण व घरबांधणीसाठी आर्थिक मदत घेणाऱ्या कर्मचाऱ्यांची मोठी अडचण झाली आहे. सुमारे १७,५०० कोटींचा हा निधी ईपीएफओकडे हस्तांतरित झाल्यास, राज्य सरकारने २००८ मध्ये स्वयंबळावर मंजूर केलेली पेन्शन योजना लागू करण्याचा मार्ग कायमचा बंद होईल, असा इशाराही भोयर यांनी दिला.

## महावॉकेथॉन वॉक फॉर वॉटर; पाणी आडवा पाणी जिरवाचा गजर

**नांदेड (प्रतिनिधी)** –माती वाचवा, पाणी वाचवा, सुरक्षित भविष्य घडवा, जल है तो कल है, आजचे पाणी संवर्धन उद्याचे सुरक्षित भविष्य, पाणी आडवा पाणी जिरवा या संदेशांनी परिसर दुमदुमला. महावॉकेथॉनमध्ये भाग घेणाऱ्यांना मान्यवरांनी दिली जलसंधारण दिनाची शपथ.

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री जल क्रांतीचे प्रणेते स्वर्गीय सुधाकरराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त मृदा व जलसंधारण विभागाच्यावतीने शुक्रवारी जलसंधारण दिन आणि महावाकेथॉनचे आयोजन शासकीय तंत्रनिकेतन मैदान नांदेड येथे करण्यात आले होते. यावेळी आमदार श्रीजया चव्हाण, महापौर कविता मुळे, कुलगुरू मनोहर चासकर, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील, जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन, मनपा आयुक्त महेशकुमार डोईफोडे, मृद व जलसंधारण अधीक्षक अभियंता अजित परांडे, जिल्हा नियोजन अधिकारी सुधाकर चिंचाने, जिल्हा क्रीडा अधिकारी भैरवनाथ नाईकवाडी, जलसंपदाचे कार्यकारी अभियंता देशमुख यांच्यासह विविध विभागाचे विभाग प्रमुख यांची उपस्थिती होती.

या महावाकेथॉनमध्ये नांदेड शहरातील यशवंत महाविद्यालय, महात्मा फुले हायस्कूल बाबानगर, राजर्षी शाहू महाराज हायस्कूल वसंतनगर, केंब्रिज हायस्कूल, शिवाजी हायस्कूल, पीपल्स हायस्कूल, के. आर. एम. महाविद्यालय, सम्राट अशोक हायस्कूल, एनएसबी कॉलेज, गुजराती हायस्कूल आदी शाळांमधून विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयाच्या परिसरात मृद व जलसंधारण विभागाच्या विविध कामाच्या चित्र प्रदर्शनी मांडण्यात आल्या होत्या.

## घर दोघांचे, हक्क दोघांचे! धनेगाव, नाळेश्वर, पिंपळगाव, तुप्पा संयुक्त मालकी हक्काचा जागर

**नांदेड (प्रतिनिधी)** –महिला आर्थिक विकास महामंडळ, नांदेड जिल्हा समन्वय अधिकारी अनंत खेत्रे यांच्या मार्गदर्शनाखाली संयुक्त मालकी हक्क – घर दोघांचे, हक्क दोघांचे या अभियानांतर्गत नव तेजस्वीनी योजना अंतर्गत धनेगाव व नाळेश्वर येथे महिलांमध्ये जनजागृती कार्यक्रम उत्साहात पार पडला. या अभियानाच्या माध्यमातून महिलेच्या नावावर घर, जमीन व मालमत्तेतील हक्काची नोंद असणे म्हणजे केवळ कागदावरील नाव नसून तिच्या आर्थिक व सामाजिक सुरक्षिततेचा मजबूत आधार आहे, हा संदेश महिलांपर्यंत पोहोचविण्यात आला.

व्यवस्थापक राहुल शिंदे यांच्या नियोजनाने कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमात सहयोगिनी शशिकला जाधव, हर्षदा गजभारे, मीना कसबे, शर्मिला वाढवे, प्रभावती लोकेवार, बचत गटातील महिला, ग्रामस्थ व महिला प्रतिनिधींचा उत्स्फूर्त सहभाग पाहायला मिळाला. महिलांनी हातात संयुक्त मालकी हक्क अभियानाची माहितीपत्रके घेऊन गावामध्ये जनजागृती केली. घराच्या मालकीमध्ये पतीसोबत पत्नीचेही नाव असावे, यासाठी कुटुंबांनी पुढाकार घेण्याचे आवाहन करण्यात आले.

**संयुक्त मालकी हक्क का महत्त्वाचा?**

महिलांना मार्गदर्शन करताना संयुक्त मालकी हक्कामुळे महिलेला मालमत्तेच्या बाबतीत समान हक्क, आर्थिक सुरक्षितता आणि कुटुंबातील निर्णय प्रक्रियेत अधिक सक्षम स्थान मिळू शकते, याबाबत माहिती ग्रामसेविका ससाणे यांनी दिली. घराच्या मालकीमध्ये महिलेचे नाव असल्यास तिच्या भविष्यासाठी एक सुरक्षित आधार निर्माण होतो.



महिला कुटुंबाच्या उभारणीत महत्त्वाची भूमिका बजावते. घरासाठी बचत करणे, कुटुंबाची जबाबदारी सांभाळणे, मुलांच्या शिक्षणासाठी योगदान देणे अशा अनेक जबाबदाऱ्या महिला पार पाडतात. त्यामुळे घराच्या मालकी हक्कातही तिचा समान सहभाग असणे आवश्यक आहे, असा संदेश या अभियानातून देण्यात आला.

कार्यक्रमादरम्यान महिलांना संयुक्त मालकी हक्काची संकल्पना, त्याचे फायदे, मालमत्तेच्या कागदपत्रांमध्ये पत्नीचे नाव समाविष्ट करण्याची प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रे आणि संबंधित कार्यालयीन कार्यपद्धती याबाबत प्राथमिक मार्गदर्शन करण्यात आले.


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com